दैनिक अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक

# राष्ट्र सह्याद्री

www.rashtrasahyadri.com

❋ संपादक : काकासाहेब नवले ❋ RNI No. MAHMAR/2019/82605 ❋ वर्ष ७ वे ❋ पाने १० ❋ मूल्य रु. ४.०० ❋ अंक १०८ ❋ वार २६ जानेवारी २०२६
❋ पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282




# श्रीरामपूर तालुक्यात उभारणार

# विमान इंधन प्रकल्प

## ४००० एकरांवरील प्रकल्प देणार हजारो नोकऱ्या

### बावनकुळेंच्या अध्यक्षतेखाली समिती; मंत्री पंकजा मुंडे आणि उदय सामंत यांचा समावेश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर : श्रीरामपूर तालुक्यातील हरेगाव येथील महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या ०४ हजार एकर जमिनीवर जागतिक दर्जाचा शाश्वत विमान इंधन (निगेटिव्ह नेट झिरो इंधन) प्रकल्प उभारला जाणार आहे. या भव्य प्रकल्पाला जमीन हस्तांतरित करण्याची प्रक्रिया राबविण्यासाठी राज्य सरकारने महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय मंत्रिमंडळ उपसमितीची स्थापना केली आहे.




मुंबईतील 'झेडआरटू ग्रुप होल्डिंग्स लि.' या कंपनीमार्फत हा प्रकल्प साकारला जाणार आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या ३१ डिसेंबर २०२५ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत विमान वाहतुकीसाठी लागणारे शाश्वत इंधन तयार करणाऱ्या प्रकल्पावर सविस्तर चर्चा करण्यात आली होती. त्यानंतर आता या निर्णयाला गती देण्यासाठी एक उच्चस्तरीय समितीची स्थापना करण्यात आली आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखालील समितीत पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे आणि उद्योगमंत्री उदय सामंत यांचा समावेश आहे.

या प्रकल्पासाठी शेती महामंडळाची जमीन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे (एमआयडीसी) वर्ग केली जाणार आहे. दरम्यान या प्रकल्पामुळे श्रीरामपूर तालुक्यात रोजगार उपलब्ध होईल व श्रीरामपूरची भरभराट होईल, अशी अपेक्षा नागरिकांना आहे.

**ZR GROUP HOLDING**

**या प्रकल्पासाठी शेती महामंडळाची जमीन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे (एमआयडीसी) वर्ग केली जाईल. सुरुवातीला ही जमीन ४९ वर्षांच्या दीर्घ मुदतीसाठी भाडेतत्त्वावर दिली जाणार असून पुढील ४९ वर्षासाठी नूतनीकरणाची तरतूदही प्रस्तावित करण्यात आली आहे. अशाप्रकारे एकूण ९८ वर्षासाठी या जमिनीचा वापर या प्रकल्पासाठी केला जाईल.**

# ड्रग्स तस्करीतला 'माऊली' खा. लंकेचा कार्यकर्ता!

## पोलिसांनी सत्य लपवू नये : डॉ. सुजय विखे पाटलांचा हल्ला



**'ड्रग्ज माफिया' चत्तरसोबत कुणाचे फोटो?**

**सार्वजनिक आयुष्यात हजारो लोक भेटतात, फोटो काढतात. कुणाच्या कपाळावर त्याची गुन्हेगारी पार्श्वभूमी लिहिलेली नसते. एका फोटोवरून नाते जोडणे म्हणजे बालिशपणा आहे. जर एका फोटोवरूनच ड्रग्जशी संबंध जोडायचा असेल, तर या प्रकरणातील मुख्य आरोपी भूषण उर्फ ऋषी चत्तर याच्यासोबत माजी खासदार सुजय विखे पाटील आणि पारनेरचे आमदार काशिनाथ दाते यांचे अतिशय जवळचे फोटो काय सांगतात? या तर्काने मग 'ड्रग्ज माफिया' कोण?**

**– खा. निलेश लंके**

**अहिल्यानगर** : पुणे जिल्ह्यातील शिरुर येथे पकडलेल्या ड्रग्ज प्रकरणाचे धागेदोरे अहिल्यानगरपर्यंत पोहोचले आहेत. या प्रकरणात अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेच्या श्यामसुंदर विश्वनाथ गुजर या पोलिस कर्मचाऱ्याला अटक झाली आहे. शिरुर येथील गॅरेजचालक शादाब शेख याच्याकडे सापडलेले ड्रग्ज पारनेर तालुक्यातील कोहोकडी येथील ज्ञानदेव उर्फ माऊली बाळू शिंदे याने दिल्याचे तपासात समोर आले आहे. आता हा माऊली शिंदे खासदार निलेश लंके यांचा कट्टर कार्यकर्ता असल्याच्या चर्चा सुरू झाल्या आहेत.

माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी या ड्रग्ज प्रकरणात पोलिसांवर गंभीर आरोप केले. श्यामसुंदर गुजर हा काही दिवसांपूर्वी पारनेर पोलिस स्टेशनला कार्यरत होता. तेथे त्याच्या कार्यपद्धतीवर गंभीर आरोप झाले होते आणि अवैध व्यावसायिकांशी त्याचे संबंध असल्याचे सांगितले जाते. त्याच्याविरोधात तक्रारी आल्यानंतर त्याची बदली थेट अहिल्यानगर एलसीबी शाखेत करण्यात आली. गंभीर आरोप असलेल्या पोलिस कर्मचाऱ्याला एलसीबीत कसे घेतले जाते? असा सवाल विखे पाटलांनी उपस्थित केला. शिवाय, त्याला एलसीबीत घेण्यासाठी कुणाची शिफारस होती, हे पोलिसांनी पत्रकारांना सांगावे, असे आव्हानही त्यांनी दिले.

या प्रकरणातील शिरुर पोलिस ठाण्यात दाखल एफआयआर व्हायरल झाली असून, त्यात पारनेर तालुक्यातील कोहोकडी येथील माऊली शिंदेचा सहभाग दर्शविला आहे. माऊली शिंदेचे खासदार निलेश लंके आणि त्यांच्या पत्नी राणी लंके यांच्यासोबतचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. अगदी शिंदेच्या मुलाच्या वाढदिवसाच्या कार्यक्रमात लंके उपस्थित असल्याचे फोटो समोर आले आहेत. या फोटोंमुळे राजकीय वातावरण तापले आहे. (पान ४ वर)

# पत्नीवर संशय...

# पतीचा गळा आवळून खून!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**२४ जानेवारीची सकाळ. दत्तनगरच्या जिल्हा परिषद शाळेच्या मागे रडण्याचा आवाज येत होता. गावचे पोलीस पाटील अनिल गायकवाड यांनी हे लक्षात घेतले आणि तातडीने पोलीस कॉन्स्टेबल कैलास झिने यांना फोन केला. इथे एक माणूस मृत पडला आहे, असे त्यांनी सांगितले. पोलिस घटनास्थळी पोहोचले. तिथे मानसकुमारचा मृतदेह पडला होता. डोक्यात मार लागलेला, थोडे रक्त सांडलेले आणि गळ्यावर काळ्या रंगाचा व्रण – हे सर्व प्रथमदर्शनी दिसत होते. घर विजू पटाट यांचे असल्याचे कळले आणि चौकशी सुरू झाली.**

**श्रीरामपूर** : तालुक्यातील दत्तनगर हे छोटेसे गाव, जिथे शांतता आणि साधेपणा नेहमीच वास्तव्य करतो. पण २४ जानेवारी २०२६ च्या सकाळी, या गावात एक भयानक घटना घडली, जी केवळ एक गुन्हा नव्हती, तर एका तुटलेल्या नात्यातील दुःखद अंताची कहानी होती.

एका स्त्रीची असह्य वेदना, संशयाच्या विषारी छायेत जळणारे वैवाहिक जीवन आणि शेवटी एका क्रूर निर्णयाची परिणती – ही आहे रश्मिता आणि मानसकुमार शाहू यांची कहानी.

रश्मिता आणि मानसकुमार हे जोडपे दत्तनगरमध्ये विजू पटाट यांच्या घरी भाडोत्री म्हणून राहत होते. बाहेरून पाहता, त्यांचे जीवन साधे दिसत होते. पण घराच्या चार भिंतींमागे एक वेगळीच कहानी लपलेली होती. मानसकुमार दारूच्या व्यसनात बुडाला होता.

रोजची दारू, त्यानंतरची मारहाण आणि चारित्र्यावरचा संशय – हे रश्मितासाठी नित्याचे झाले होते. तू कोणाशी बोलतेस? तुझे चारित्र्य कसे? असे प्रश्न आणि आरोप रोजच्या जेवणासारखे होते. रश्मिता, एक साधी गृहिणी, या त्रासाला कंटाळली होती.

तिच्या मनात दुःख, राग आणि असहायता भरून गेली होती. किती वेळा तिने सहन केले असेल? किती वेळा तिच्या डोळ्यात अश्रू आले असतील? पण कोणाला सांगणार? गावातल्या लोकांना काय म्हणणार?



रश्मिता तिथे होती. तिच्या चेहऱ्यावर भय आणि उदासी मिश्रित भाव होते. पोलिसांनी विचारले, हा कोण? तिने उत्तर दिले, माझा नवरा. पण त्याच्या मृत्यूबाबत तिची उत्तरे उडवाउडवीची होती. ती मृतदेहाला रुग्णालयात नेण्यास नकार देत होती. तात्काळ अंत्यविधी करूया, असे ती म्हणत होती. पोलिसांना संशय आला. त्यांनी रुग्णवाहिका बोलावली आणि मृतदेह साखर कामगार हॉस्पिटलमध्ये नेला. तिथे डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांना माहिती मिळाली. त्यांनी टीमसह तपास सुरू केला. प्रथम आकस्मिक मृत्यू म्हणून नोंद झाली, पण शवविच्छेदनातून खरे सत्य समोर आले. पीएमटी हॉस्पिटल, लोणी येथे झालेल्या तपासणीत वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सांगितले की, मृत्यू नैसर्गिक नव्हता. निरीक्षक देशमुख आणि सहायक निरीक्षक जाधव यांनी रश्मिताला विश्वासात घेतले.

सखोल चौकशी केली. सुरुवातीला ती गप्प राहिली, पण शेवटी तिच्या मनातील बोझा हलका झाला. तिने कबुली दिली: तो रोज दारू पिऊन मारहाण करायचा. माझ्या चारित्र्यावर संशय घ्यायचा. मी सहन करून थकले होते. मी त्याच्या डोक्यात आंब्याचे लाकूड मारले आणि गळा आवळला.ही कबुली ऐकून पोलिसही स्तब्ध झाले. एका स्त्रीची असह्य वेदना, घरगुती हिंसा आणि संशयाच्या विषारी वातावरणातून निर्माण झालेला हा गुन्हा.

श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल झाला. कॉन्स्टेबल कैलास झिने यांनी फिर्याद दिली आणि रश्मिताला अटक करण्यात आली. निरीक्षक देशमुख आणि त्यांच्या टीमने योग्य तपास करून हा प्रकार उघडकीस आणला.

पण ही कहानी केवळ गुन्ह्याची नाही. ही आहे एका नात्यातील विश्वासाच्या अभावाची, दारूच्या व्यसनाने उध्वस्त झालेल्या कुटुंबाची आणि एका स्त्रीच्या असह्य दुःखाची. दत्तनगरच्या या घटनेने गावकऱ्यांना विचार करायला भाग पाडले – संशय आणि हिंसा कधीही सुखी जीवन देत नाही.

रश्मिताचे भविष्य आता न्यायालयाच्या हाती आहे, पण तिच्या कहानीतून एक धडा मिळतो: नात्यात विश्वास आणि संवाद नसेल, तर ते केवळ दुःखद अंताकडे नेते.

## महत्त्वाचे..



### रघुवीर खेडकर यांना पद्मश्री पुरस्कार

**अहिल्यानगर** : जिल्ह्याचे भूमीपुत्र आणि तमाशा कलावंत रघूवीर खेडकर यांचा यंदाच्या पद्म पुरस्काराने झालेला सन्मान महाराष्ट्राच्या ग्रामीण कलेचा गौरव असून, तमाशा कलेचा नावलौकीक झाला असल्याची प्रतिक्रीया जलसंपदा तथा पालक मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केली. रघूवीर खेडकर यांना पद्म पुरस्कार जाहीर झाल्यानंतर मंत्री राधाकृष्ण विखे यांनी त्यांचे दूरध्वनीवरून अभिनंदन केले. खेडकर परीवाराचे मोठे योगदान तमाशा कलेसाठी आहे.जेष्ठ तमाशा कलावंत स्व.कांताबाई सातारकर यांच्या कडून मिळालेला कलेचा समृध्द वारसा रघूवीर खेडकर यांनी यशस्वीपणे पुढे नेला.आव्हानात्मक परीस्थितीत तमाशा कलेला जिवंत ठेवण्यासाठी समर्पित भावनेने दिलेल्या योगदानाचा गौरव केंद्र सरकारने पद्म पुरस्कार देवून केल्याचा अभिमान असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले. ग्रामीण महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचा अविभाज्य भाग म्हणून तमाशा कलेकडे पाहीले जाते. अनेक जेष्ठ श्रेष्ठ कलाकारांनी आपल्या त्यागाने महाराष्ट्राच्या कला परंपरेची जोपासना करणार्या प्रत्येक कलावंताचा बहुमान या पुरस्काराने झाला असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले.

## झापुक । zupuk

शाळा म्हणाली
१५ ऑग २६ जानेवारी
आला की आम्ही
खुश होतो
निदान सहा
महिन्यातून का होईना
कचरा आमचा साफ होतो

नवनाथ कुताळ
९४२२२३१८२५

## सुट्टीची सूचना

सर्व वाचक आणि जाहिरातदारांना सूचित करण्यात येते की, प्रजासत्ताक दिनानिमित्त सोमवार, दि. २६ जानेवारी २०२६ रोजी दै. राष्टसह्याद्री कार्यालयास सुट्टी असेल. त्यामुळे मंगळवार, दि. २७ जानेवारी २०२६ रोजी अंक प्रकाशित होणार नाही. कृपया याची नोंद घ्यावी.

– संपादक

२६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!
श्री.रविंद्र मच्छिंद्र बाचकर
तलाठी राहुरी बु., ता.राहुरी, जि.अहिल्यानगर



२६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!
मा.श्री.किसन चंद्रभान भिंगारदे
ग्रामपंचायत अधिकारी, ग्रा.प.टाकळीभान
सर्व कर्मचारी वृंद ग्रा.प.टाकळीभान
ता.श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर

प्रजासत्ताक दिनानिमित्त व दैनिक राष्ट्र सह्याद्री शिर्डी विभागीय कार्यालयास हार्दिक शुभेच्छा!
इंजिनिअर अनिकेत अरुण दिघे
सिव्हील इंजिनिअर गव्हर्नमेंट कॉन्टॅक्टर
मु. धानोरे, ता. राहूरी, जि. अहिल्यानगर
मोबा नं. ८८८८४५४६५०



२६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!
मा.श्री.सुभाष नानासाहेब मांजरे
गव्हर्मेन्ट कॉन्ट्रॅक्टर, भोकर
ता.श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर

प्रजासत्ताक दिनानिमित्त व दैनिक राष्ट्र सह्याद्री शिर्डी विभागीय कार्यालयास हार्दिक शुभेच्छा!
मा. श्री. ज्ञानेश्वर अहिरे साहेब
राष्ट्रीय अध्यक्ष
एकलव्य भिल्ल सेना,
महाराष्ट्र राज्य
शुभेच्छुक : हनुमंतगाव अहिरे साहेब मित्रमंडळ, ता. राहाता, जि. अहिल्यानगर, महाराष्ट्र



प्रजासत्ताक दिनानिमित्त व दैनिक राष्ट्र सह्याद्री शिर्डी विभागीय कार्यालयास हार्दिक शुभेच्छा!
वैष्णवी मेडिकल्स
मु. धानोरे पो. सोनगाव ता.राहुरी
जि.अहिल्यानगर डॉ बोरा हॉस्पिटल शेजारी

दैनिक राष्ट्र सह्याद्री माध्यम समूह
(प्रिंट। वेब । युट्युब । सोशल मीडिया मॅनेजमेंट)
सातव्या यशस्वी वर्षात पुढील पाऊल...
सस्नेह निमंत्रण
सन्माननीय श्री /सौ.

राष्ट्र सह्याद्री माध्यम समूह
आपल्या सर्वांच्या प्रेमळ सहकार्याने आणि वाचक-प्रेक्षकांच्या अखंड विश्वासाने अहिल्यानगर जिल्ह्यातून सुरू झालेला हा माध्यम समूह आज पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, जालना,बीड, धाराशिव आणि लातूर या आठ जिल्ह्यांमध्ये मजबूतपणे उभा आहे.
दैनिक वर्तमानपत्र प्रिंटिंग बरोबरच साईवेद प्रकाशन आणि आध्या प्रिंटर्स यांच्या माध्यमातून दर्जेदार प्रिंटिंग व प्रकाशन सेवा देत असताना, आता आम्ही आणखी एक महत्त्वाचे पाऊल टाकत आहोत...
शिर्डी कार्यालय शुभारंभ
सोमवार दि. २६ जानेवारी २०२६ रोजी । कार्यक्रमाची वेळ:❋ दुपारी ०४.०० वाजता
स्थळ : राष्ट्र सह्याद्री कार्यालय, शिर्डी (साई प्रसाद कॉम्प्लेक्स, बस स्थानकाशेजारी, शिर्डी)
या ऐतिहासिक क्षणी आपण सर्वजण उपस्थित राहून आम्हाला आशीर्वाद आणि प्रोत्साहन द्यावे, ही विनंती.
साईवेद प्रकाशन – राष्ट्र सह्याद्री माध्यम समूह
संपर्क: 7774001818 । ईमेल: rashtrasahyadri@gmail.com । वेबसाइट: www.rashtrasahyadri.com । युट्युब/फेसबुक/इन्स्टाग्राम: @rashtrasahyadri
जय हिंद, जय महाराष्ट्र
२६ जानेवारी २०२६ – एक नवीन सुरुवात!

# संपादकीय

## गुन्हेगारांसोबत फोटो आणि राजकीय आरोपांचे जाळे..!

अहिल्यानगर जिल्ह्यातील राजकीय वातावरण सध्या ड्रग्स प्रकरणातील आरोप–प्रत्यारोपांच्या आगीत धुमसत आहे. खासदार निलेश लंके आणि माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्यातील शाब्दिक युद्ध नवे नाही, पण या वेळी ते गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींशी जोडलेल्या फोटोंच्या माध्यमातून अधिक तीव्र झाले आहे. एका बाजूने विखे पाटील लंके यांच्यावर ड्रग्स प्रकरणातील आरोपी ज्ञानदेव उर्फ माऊली शिंदे यांच्याशी निकट संबंध असल्याचा आरोप करतात, आणि लंके यांच्या पत्नीसोबतचे फोटो पुरावा म्हणून सादर करतात. दुसऱ्या बाजूने लंके विखे पाटलांना 'ड्रग्स माफिया' भूषण उर्फ ऋषी चत्तरसोबतचे फोटो दाखवून त्यांच्याच तर्काने प्रत्युत्तर देतात. हे केवळ दोन नेत्यांमधील वैयक्तिक द्वंद्व नाही, तर राज्यातील राजकारणातील एक मोठी समस्या उघड करणारे वास्तव आहे. नेते आणि गुन्हेगारांमधील संशयास्पद कनेक्शन, हा मुद्दा राजकीय चर्चेच्या केंद्रस्थानी आहे.

विखे पाटील व लंके हे वैर लोकसभा निवडणुकीपासूनच वाढत चालले आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत अहिल्यानगर (पूर्वीचे अहमदनगर) मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसच्या निलेश लंके यांनी भाजपचे डॉ. सुजय विखे पाटील यांना पराभूत केले. ही निवडणूक केवळ राजकीय नव्हती, तर वैयक्तिक आणि कौटुंबिक वैराचीही होती. विखे कुटुंबाचा व भाजपचा पारंपरिक गड असलेल्या या मतदारसंघात लंके यांचा विजय हा विखे पाटलांसाठी मोठा धक्का होता. त्यानंतरच्या काळात दोघांमधील आरोप–प्रत्यारोप वाढले – विकासाच्या मुद्द्यांपासून ते वैयक्तिक हल्ल्यांपर्यंत. आता ड्रग्स प्रकरणाने हे वैर नव्या वळणावर पोहोचले आहे. लंके यांचे यापूर्वीही कुख्यात व्यक्तींशी फोटो व्हायरल झाले आहेत, पुण्यातील डॉन गजानन मारणे किंवा सिस्पे घोटाळ्यातील व्यक्ती, यांचा त्यात समावेश होता.दुसरीकडे, विखे पाटलांना लंके यांनी ड्रग्स माफियाशी तसेच कुणा सारख्या गंभीर कोण आहे तिला आरोपी दीपक पोकळे याच्याशी जोडले आहे. असे आरोप प्रत्यारोप केवळ राजकीय लाभासाठी आहेत की त्यात तथ्य आहे, हे तपास यंत्रणांनी स्पष्ट करणे गरजेचे आहे. पण हा मुद्दा फक्त लंके किंवा विखे यांच्यापुरता मर्यादित नाही. महाराष्ट्रातील राजकारणात अनेक नेते गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींना जवळ करतात – मग ते निवडणुकीत मदतीसाठी असो किंवा स्थानिक प्रभावासाठी. थोड्या फरकाने अशी उदाहरणे सर्वच पक्षांमध्ये दिसतात. पूर्वी हे कनेक्शन लपवणे शक्य होते, पण सोशल मीडियाच्या युगात ते असंभव झाले आहे. एक फोटो व्हायरल झाला की, तो लाखो लोकांपर्यंत पोहोचतो. जनतेच्या मनात संशय निर्माण होतो – ''आमचे नेते खरेच जनसेवक आहेत की गुन्हेगारीचे संरक्षक?'' हा विचार नेत्यांच्या प्रतिमेवर विपरीत परिणाम करतात, आणि शेवटी मतदारांच्या विश्वासाला तडा जातो. ड्रग्स, घोटाळे किंवा इतर गुन्ह्यांशी जोडले जाणे हे राजकीय करिअरसाठी आत्मघातकी आहे. यातून नेतेमंडळींनी धडा घ्यायला हवा. गुन्हेगारीपासून चार हात लांब राहा. सार्वजनिक जीवनात हजारो लोक भेटतात, फोटो काढले जातात, हे खरे आहे. पण संशयास्पद व्यक्तींशी निकटता टाळणे, ही जबाबदारी नेत्यांची आहे. राजकारण विकास, जनकल्याण आणि नीतिमत्तेवर आधारित असावे, न की फोटो आणि आरोपांच्या जाळ्यात अडकलेले. लंके आणि डॉ. विखे यांच्यातील हे युद्ध जर विकासावर केंद्रित झाले तरच जनतेचा फायदा होईल. अन्यथा, हे केवळ राजकीय अपप्रचाराचे साधन ठरेल, आणि शेवटी जनताच फसली जाईल. नेत्यांनी आता स्वतःला तपासावे – काचेच्या घरात बसून दगडफेक करण्यापेक्षा, आपली खिडकी स्वच्छ करणे अधिक योग्य ठरेल.

# पुनर्वसन–प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न कॅम्पमध्ये निकाली

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा(:** तहसील कार्यालयात घेण्यात आलेल्या प्रकल्पग्रस्तांच्या कॅम्पमध्ये पन्नास वर्षांपासून प्रलंबित असलेल्या पुनर्वसन व प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नांना मार्गी लावण्याचे काम झाले हे एक उत्तम उदाहरण नेवासा तालुक्यात पाहायला मिळाले. नेवासा येथे महसूल यंत्रणेच्या सक्रियतेमुळे वरील ऐतिहासिक निर्णय झाला.



महाराष्ट्र राज्यामध्ये मोठमोठे विकास प्रकल्प उभारले जात असताना हजारो गावे व कुटुंबे प्रकल्पग्रस्त ठरतात. प्रकल्पाच्या सुरुवातीला शासन स्तरावरून विविध आश्वासने व प्रलोभने दिली जातात; मात्र प्रत्यक्षात पुनर्वसन व नुकसान भरपाईचे प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित राहतात. या जटिल समस्यांसाठी सामाजिक कार्यकर्ते व शेतकरी संघटना आंदोलने, निवेदने व संघर्षाचा मार्ग अवलंब करत असतात. कधी त्यांना यश मिळते, तर कधी निराशा पदरी पडते.

नेवासा येथील प्रकल्पग्रस्त व पुनर्वसन प्रश्नांसाठी सातत्याने लढा देणारे धरणग्रस्त कृती समितीचे अध्यक्ष मच्छिंद्र पाटील मारले यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाचे अनेक दिवस उंबरठे झिजवले. प्रश्न सुटत नसल्याने त्यांनी मुंबई येथे आत्मदहनाचा इशाराही दिला होता.
प्रशासनातील संवेदनशील अधिकाऱ्यांनी या गंभीर प्रश्नाची दखल घेतल्यानंतर परिस्थिति बदलली.

अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी पंकज आशिया यांच्या मार्गदर्शनाखाली अप्पर जिल्हाधिकारी शैलेश हिंगे यांनी पुनर्वसन प्रश्न आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या आंदोलनाला सकारात्मक साथ देत प्रत्यक्ष कृतीत उतरवण्याचा निर्णय घेतला.त्याअनुषंगाने नेवासा येथे विशेष कॅम्पचे आयोजन करण्यात आले.या कॅम्पमध्ये प्रांताधिकारी सुधीर पाटील व तहसीलदार डॉ. संजय बिरादार यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण महसूल यंत्रणा कामाला लागली.

या ऐतिहासिक कॅम्पमध्ये सुमारे ३०० प्रकरणे निकाली काढण्यात आली, जी तब्बल पन्नास वर्षांपासून प्रलंबित होती. महसूल कर्मचाऱ्यांनी जागीच आवश्यक कागदपत्रे तयार करून शेतकऱ्यांना सुपूर्द केली. त्यामुळे प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले.

या यशस्वी उपक्रमाबद्दल प्रहार जनशक्ती पक्षाचे युवा जिल्हाध्यक्ष पांडुरंग औताडे यांनी संपूर्ण महसूल यंत्रणेचे मनापासून आभार मानले.कॅम्पदरम्यान शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी सर्व महसूलअधिकारी व कर्मचारी यांनी विशेष सहकार्य केले.यावेळी उपस्थित शेतकऱ्यांमध्ये संदीप बेळगे, नवनाथ फासाटे, प्रभाकर मुकुटमल,उत्तम फटांगरे,गुलाब शेख,दत्तात्रय आगळे, नाना रोकडे, दत्तात्रय निकम,महादेव आव्हाड, योगेश बाचकर तसेच भारतीय स्वाभिमानी संघाचे गणपतराव मोरे व रामभाऊ मगरे आदींचा समावेश होता.

# मांढरेवस्ती जि. प. शाळेत माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात

आश्वी | प्रतिनिधी

मांढरेवस्ती येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत नुकताच माजी विद्यार्थी मेळावा मोठ्या उत्साहात आणि भावनिक वातावरणात संपन्न झाला. या मेळाव्याचे प्रमुख आकर्षण ठरले ते शाळेचे ८३ वर्षीय माजी शिक्षक वंसत उर्फ महादु सहादु ताजणे गुरुजी. त्यांच्या उपस्थितीने संपूर्ण कार्यक्रमास विशेष भावनिक साज चढला.

शासनाच्या निर्देशानुसार आयोजित करण्यात आलेल्या या मेळाव्याची सुरुवात सरस्वती पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. लक्ष्मण भोसले होते. शाळेचे



मुख्याध्यापक राजेंद्र शिंदे यांनी प्रास्ताविकात शाळेचा गौरवशाली इतिहास सांगत उपस्थितांचे स्वागत केले.

गुरुजींवर गुलाबपाकळ्यांची उधळण शिस्तप्रिय व अत्यंत लोकप्रिय शिक्षक म्हणून ओळख असलेले वसंत ताजणे गुरुजी शाळेच्या प्रांगणात दाखल होताच माजी विद्यार्थ्यांनी गुलाबपाकळ्यांची उधळण करत त्यांचे जंगी स्वागत केले. आपल्या लाडक्या विद्यार्थ्यांचे प्रेम पाहून गुरुजी भावूक झाले. त्यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला असता अनेकांच्या डोळ्यांत अश्रू तरळले. प्रशासनाच्या वतीने वर्षा दातीर (विशेष शिक्षक, दिव्यांग विभाग, पंचायत समिती संगमनेर) यांनी उपस्थित राहून मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आभार दत्तू मुंढे यांनी मानले. याप्रसंगी प्रदीप मांढरे व अंजली मांढरे यांनी शाळेला प्रेशर रेग्युलेटर, नळी व शेगडी अशी उपयुक्त साहित्य भेट वस्तूरूपाने प्रदान केली.

# पीएमश्री स्कूल येथे बाल आनंद मेळावा उत्साहात



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कुकाणा** - नेवासा तालुक्यातील भेंडा बु येथील पी एम श्री भेंडा फॅक्टरी जि प शाळेत बाल आनंद मेळावा व महिला पालकांसाठी

हळदी कुंकू कार्यकम आयोजित केला होता. छत्रपती शिवाजी महाराज तसेच सरस्वती देवी यांच्या अतिशय सुंदर सजवलेल्या मूर्ती कार्यक्रमाचे सौदर्य खुलवत होत्या. मुख्याध्यापक –संजय कडूस यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले त्यानंतर ज्येष्ठ महिला पालक अमृताताई रसाळ यांच्या शुभहस्ते रांगोळी प्रदर्शनाचे उद्घाटन झाले बाल आनंद मेळाव्यात तब्बल ९० हजार रुपयांची आर्थिक उलाढाल झाली. सदरच्या कार्यक्रमाला माजी जिल्हा परिषद सदस्य – दत्तूभाऊ काळे तसेच माजी नेवासा बाजार समितीचे माजी सभापती – डॉ शिवाजीराव शिंदे, माजी सरपंच प्रा. उषाताई मिसाळ, संगीता गव्हाणे, सरपंच सुहासिनी मिसाळ, उपसरपंच संगिता शिंदे, जलमित्र –सुखदेवराव फुलारी, डॉ लहानू मिसाळ, नामदेवराव शिंदे, किशोर मिसाळ, संजय नवले, राजू चिंधे,शालेय व्यवस्थापन समिती चे अध्यक्ष संदिप फुलारी, अर्चना रसाळ, त्याचप्रमाणे अनेक मान्यवर आणि महिला सदस्य उपस्थित होत्या. सर्व ग्रामस्थांनी उत्कृष्ट कार्याबद्दल मुख्याध्यापक संजय कडूस यांचा सन्मान केला.

# लोककलावंत खेडकर यांचा पद्म पुरस्काराने सन्मान हा जिल्ह्याचा गौरव : मा. मंत्री थोरात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर :**महाराष्ट्राला लोककलांची मोठी परंपरा असून स्वर्गीय कांताबाई सातारकर यांचा समृद्ध वारसा घेऊन लोककलावंत रघुवीर खेडकर यांनी आयुष्यभर समर्पित भावनेने तमाशाच्या माध्यमातून सेवा केली असती त्यांना मिळालेल्या पुरस्कार हा संगमनेर तालुका व अहिल्यानगर जिल्ह्यासाठी गौरवास्पद असल्याचे महाराष्ट्राचे माजी महसूल व शिक्षण मंत्री बाळासाहेब थोरात यांनी म्हटले आहे.



लोककलावंत रघुवीर खेडकर यांना पद्म पुरस्कार जाहीर झाल्यानंतर अभिनंदन करताना लोकनेते माजी मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, रघुवीर खेडकर यांनी संगमनेरचे नाव महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचवले. तमाशा ही जिवंत कला आहे आणि या कलेमध्ये आयुष्यभर समर्पित भावनेने त्यांनी काम केले. स्वर्गीय कांताबाई सातारकर यांचा समृद्ध वारसा त्यांनी जोपासला. आधुनिक युगात तमाशा ही लोककला लोप पावते की काय अशी भीती निर्माण झाली. मात्र आपल्या सशक्त अभिनय आणि लोककलेप्रतीची आस्था यामधून त्यांनी महाराष्ट्रभर तमाशा ही लोककला सुरू ठेवली आज सुमारे ३०० लोकांची उदरनिर्वाह त्यांच्या तमाशा फडाच्या माध्यमातून सुरू असून महाराष्ट्र राज्य तमाशा फड संघटनेचे अध्यक्ष पदही त्यांनी भूषवले आहे.

# पत्रकारांकडूनच समाजाला न्याय : सुधीर नवले



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**बेलापूर :** समाजाची जनजागृती पत्रकारांच्या हातात आहे. समाजाला न्याय मिळण्याची अपेक्षा आज फक्त पत्रकारांकडूनच असल्याचे स्पष्ट प्रतिपादन श्रीरामपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुधीर नवले यांनी केले. श्रीरामपूर कृषी उत्पन्न बाजार समिती आणि बेलापूर बुद्रुक विविध कार्यकारी सहकारी सोसायटी यांच्या विद्यमाने ऐनतपूर येथील गोल्डन वॉटर कृषी पाम येथे पत्रकार दिनानिमित्ताने आयोजित पत्रकार सन्मान सोहळ्यात ते बोलत होते. शिवाजी वाबळे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.
नवले म्हणाले, व्हाट्सअप आणि युट्युब तसेच प्रिंट मीडिया वरील पत्रकारिता आज जोमाने वाढत आहे. समाजाची पत्रकारांकडून आज मोठी अपेक्षा आहे. आज पत्रकारच समाजाची अपेक्षा पूर्ण करू शकतात.
यावेळी पंचायत समितीचे माजी उपसभापती संतोष कुरहे, भरत साळुंके, ज्ञानेश्वर गवले, देविदास देसाई यांची भाषणे झाली.
यावेळी पत्रकार बाळासाहेब भांड , हाजी शफीक बागवान, संदीप आसने, महेश माळवे, करण नवले, जयेश सावंत, शिवाजी पवार, वैभव जगताप, प्रदीप आहेर, महेश रक्ताटे, रमण मुथा, शफीक शेख, रणजीत श्रीगोड, ष्णिुपंत डावरे सुनील नवले नवनाथ कुताळ शरद पुजारी अतिश देसरडा, अशोक गाडेकर, अनिल पांडे , दिलीप दायमा सुहास शेलार गोविंद साळुंखे अभिजीत राका आदि पत्रकारांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास जनता आघाडीचे अध्यक्ष रवींद्र खटोड माजी सरपंच भरत साळुंके, संस्थेचे चेअरमन किशोर नवले, व्हा. चेअरमन अन्तोन अमोलिक, माजी चेअरमन राजेंद्र सातभाई, पंडित बोंबले, ज्ञानदेव वाबळे, दत्ता कुहे, राजेश खटोड, प्रमोद कर्डिले, विक्रम नाईक, भास्कर बंगाळ, रमेश अमोलिक, सुधाकर खंडागळे, काशिनाथ गाढे, अनिल नाईक, बाळासाहेब लगे, विशाल अनिल पवार, जाकिर शेख, विजय शेलार, अय्याज शेख, सुरेश कुहे अल्ताफ शेख, अनिल नवले उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक आणि सूत्रसंचालन ज्ञानेश्वर गवले यांनी केले तर उपस्थितांचे आभार शेषराव पवार यांनी मानले.

# रुग्णांचे प्राण वाचवण्यासाठी सीपीआर आवश्यक : डॉ . दिलीप शिरसाठ

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** भारतात ७० लाख नागरिक हृदयविकाराच्या झटक्याने दगावतात त्यामध्ये ७० टक्के घरात २० टक्के सार्वजनिक ठिकाणी तर दहा टक्के हॉस्पिटलमध्ये मृत्युमुखी पडतात. अशा स्थितीत हृदयविकाराचा झटका आल्यास अशा रुग्णांना तात्काळ सीपीआर देणे आवश्यक आहे. त्यामुळे रुग्णाचे जीवन वाचू शकते असे आवाहन प्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉक्टर दिलीप शिरसाठ यांनी केले. इंडियन रेड क्रॉस सोसायटी श्रीरामपूर यांच्यावतीने बस, रेल्वे स्थानकावर बस व रेल्वे कर्मचारी तसेच प्रवासी यांना सीपीआर देण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. त्यावेळी डॉक्टर दिलीप शिरसाठ मार्गदर्शन करत होते. मार्गदर्शन करताना डॉक्टर दिलीप शिरसाठ म्हणाले सीपीआर मध्ये डाव्या आणि उजव्या हातांचे तळहात एकवटून छातीवर दाब द्यावा साधारण एक मिनिटात १०० ते १२० वेळा दाब देऊन प्रत्येक ३० दाबा नंतर एक कृत्रिम श्वास रुग्णांना तोंडाने द्यावा अत्यावश्यक सेवा उपलब्ध होईपर्यंत ही सेवा रुग्णांना दिल्यास तात्काळ रुग्ण वाचू शकतात सध्या हृदयविकाराचा धक्का कुठेही आणि कोणालाही येऊ शकतो काळजी घेणे आवश्यक असल्याचे डॉ. शिरसाठ यांनी सांगितले. यावेळी बस स्थानक व रेल्वे स्थानक तसेच प्रवाशांना डॉ. दिलीप शिरसाठ यांनी सीपीआरचा डेमो दिला. कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी प्रांताधिकारी किरण सावंत,



तहसीलदार मिलिंदकुमार वाघ, शिवा ट्रस्टचे अध्यक्ष दिलीप पवार, सुनील साळवे, डेपो मॅनेजर अनिल बेहेरे, रेल्वे मॅनेजर एम.पी. पांडे, आत्माराम काळे, प्रशांत संसारे, राजेंद्र खंडीझोड, अनिल पठारे, भीमा फुंदे, किशोर सोसे, श्रावण भोसले, पोपटराव शेळके, सुखदेव शेरे, सचिन चंदन, सुभाष बोधक, अरुण कटारे, बन्सी फेरवानी, केशव धायगुडे, सुरंजन साळवे, सुरेश वाघुले, पुष्पा शिंदे, निर्मला लांडगे आदींसह शरदचंद्रजी पवार होमिओपॅथी कॉलेज, सुप्रिया दीदी कॉलेज ऑफ नर्सिंग वडाळा महादेव येथील विद्यार्थी आदींनी विशेष परिश्रम घेतले.

# कुकाण्यात सहा भाविकांनी केली १०३ दिवसात नर्मदा पायी परिक्रमा



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** तालुक्यातील कुकाणा येथील आत्माराम लोंढे व सोपान लोंढे या सपत्नीक दांपत्यांनी व संभाजी फासे व सुभाष पवार अशा सहा भाविकांनी १०३ दिवसात नर्मदा मातेची पायी परिक्रमा पूर्ण केली.परिक्रमा यशस्वी करणाऱ्या यात्रेकरूंची टाळ मृदुंगाच्या गजरात मिरवणुकीद्वारे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले.

नर्मदा परिक्रमा सुखरुप पूर्ण करून आपल्या गावी परतल्याने कुकाणा येथील ग्रामस्थांनी गटाळ मृदंगाच्या गजरात मिरवणूक काढली तर सुवासींनीनी पंचारतीद्वारे औक्षण करून स्वागत केले तसेच ठिकठिकाणी या यात्रेकरूंचे फटाक्याच्या आतिषबाजीने व फुलांच्या वर्षावाने स्वागत करण्यात आले

मिरवणुकीत ब्रास बँड वरील भक्तिगीते तसेच बाल वारकऱ्यांनी गायलेल्या भजनाने गावातील वातावरण भक्तिमय झाले होते.भाविकांच्या दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती.सर्वच भाविक यांनी मोठा त्याग करत पायी नर्मदा पूर्ण केली व सुखरुप परतले आहेत संपूर्ण गावात भक्तीमय वातावरण निर्माण झाले आहे असल्याचे समता परिषदेचे व सावता परिषदेचे युवा नेते राहुल जावळे यांनी यावेळी बोलतांना सांगितले यामध्ये गावकऱ्यांनी एकत्रित येत ऐक्याचे दर्शन घडविल्याने त्यांनी उपस्थित गावकऱ्यांचे आभार मानले.

# रस्त्यांवर वाहतूक पोलिस नसल्याने नागरीकांमधून नाराजी

## रस्ता ओलांडतांना शाळकरी मुलांची होतेय दमछाक

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**लोणी :** लोणी बुद्रुक गावात शाळा, महाविद्यालयीन व वैद्यकीय परिसर असल्याने विद्यार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात असून गावातील एकाही चौकात लोणी पोलिस स्टेशनच्या वाहतूक शाखेचे पोलिस कर्मचारी दिसत नसल्याने नागरीकांमधून नाराजी व्यक्त केली जात आहे.

लोणी बुद्रुक गावातील बस स्थानक परिसर व पद्मश्री विखे पाटील चौकातून मोठ्या प्रमाणात विद्यार्थी तसेच नागरीकांची वर्दळ असते. त्यात अतिशय बेशिस्त पध्दतीने वाहनाची ये जात असल्याने शाळकरी विद्यार्थ्यांना रस्ता ओलांडण्यात मोठी अडचन निर्माण होत आहे.

गावातील मुख्य रस्त्यावर रिक्षा तसेच संगमनेर, श्रीरामपुरला ये जा करणार्या टॅक्सी या रस्त्याच्या अगदी मध्येच उभ्या करून प्रवासी वाहतूक करत असून त्यामुळे वाहतूक कोंडीही होत असल्याने या टॅक्सी वाहतूकदारांवर कोणाचाही वचक राहीला नसल्याचे निदर्शनास येत असून

गावातील मुख्य रस्त्यावरून जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला जाणारे छोटे विद्यार्थीही आहेत. त्यांना पद्मश्री चौकातून रस्ता ओलांडण्यास मोठ्या अडचणी येत असून भरधाव येणारी वाहनेही थांबत नसल्याने त्या विद्यार्थांना मोठ्या प्रमाणात अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

प्रसंगी पद्मश्री विखे पाटील व पद्मभूषण डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांच्या स्मारकाच्या ठिकाणी असलेल्या प्रवरा मेडीकल ट्रस्टच्या सुरक्षा रक्षकांना रस्त्यावर उतरून विद्यार्थ्यांना रस्त्यावरून शाळेकडे सोडावे लागत असून, लोणी पोलिस स्टेशनच्या वाहतूक शाखेचा एकही पोलिस कर्मचारी रस्त्यावर दिसत नसल्याने ग्रामस्थ व पालकांमधून संताप व्यक्त केला जात आहे.

गावातील सोनगाव रोड परिसरातूनही मोठ्या प्रमाणात वाहनांची ये जा असून, अगदी अल्पवयीने मुले चारचाकी, मालवाहतूक रिक्षा व दुचाकी कोणताही वाहन परवाना नसतांना भरधाव वेगाने चालवित असून, चारचाकी रिक्षा मध्ये असलेल्या कर्कश्य अशा साऊंडचा आवाजही मोठ्या स्वरुपात वाढवून गाडी चालवित असल्याने सोनगाव रोड परिसरात अपघाताचे प्रमाणही वाढले आहे.

# वाकडी राजकीय दिशा ठरवणारं गाव : विवेक कोल्हे


प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहाता :**तालुक्यातील वाकडी गाव हे राजकीय दृष्ट्या प्रभावी व दिशा ठरवणारे गाव म्हणून ओळखले जाते. याच गावात आयोजित सत्कार सोहळ्यात बोलताना युवा नेते विवेकभैय्या कोल्हे यांनी आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत गुलाल उधळण्याचा विश्वास व्यक्त केला. त्यांच्या उपस्थितीत कोपरगाव नगरपरिषदेचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष पराग संधान, उपनगराध्यक्ष जितेंद्र रणशूर, गटनेते प्रसाद आढाव तसेच सर्व नगरसेवकांचा मारुती मंदिरात सत्कार झाला. गणेश परिसरातील विविध गावांतील कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.




कोल्हे म्हणाले, वाकडी हे राजकीय निर्णयाचे केंद्र असून येथे घेतलेले निर्णय तालुक्याच्या राजकारणाला दिशा देतात. येत्या निवडणुकांत वाकडी–पुणतांबा गट गुलालाने झळाळेल. गुलामी नव्हे तर विजयाचा गुलालच स्वीकारायचा आहे. त्यांनी कार्यकर्त्यांना निवडणुकीची तयारी करण्याचे आवाहन केले.
यावेळी कार्यक्रमाध्यक्ष भाजपा नेते गंगाधर चौधरी, नगराध्यक्ष पराग संधान, चेअरमन सुधीर लहारे आदींनी मनोगत व्यक्त केले. प्रस्ताविक शिवाजी तात्या लहारे यांनी केले तर आभार बी.एल. आहेर यांनी मानले. वाकडी सोसायटी, हायस्कूल, ग्रामपंचायत व कारखान्याच्या वतीने सत्कार करण्यात आला.
पुढे बोलताना कोल्हे म्हणाले, ''सोसायटी, कारखाने, संस्था याठिकाणी आपण यापूर्वीही विजय मिळवला; मात्र २०१४ च्या विधानसभा निवडणुकीनंतर दीर्घकाळ विजयाचा गुलाल झळकला नव्हता, तो आता कोपरगाव नगरपालिकेच्या रूपाने प्राप्त झाला. सहकारात राजकारण आणू नये, तरीही विरोधकांनी कारखान्याला अडचणीत आणण्याचे प्रयत्न चालू असल्याचा त्यांनी उल्लेख केला. तसेच भविष्यात सत्ता हाती घेतल्याशिवाय आम्ही राहणार नाही, आणि सत्तेत गेल्यावर गणेश परिसरात अधिक वेगाने विकास करू, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.
या कार्यक्रमामुळे वाकडी परिसरातील आगामी निवडणुकांचे राजकीय वातावरण तापण्यास सुरुवात झाली आहे.

# गटकळ स्कूलमध्ये हळदी कुंकवाचा कार्यक्रम उत्साहात



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**टाकळीभान :** येथील लेट एकनाथ नामदेव गटकळ इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये नुकताच अॅड. भाऊसाहेब टेमक व सुरेखा टेमक यांच्या अध्यक्षतेखाली मकर संक्रांती निमित्त हळदी कुंकवाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.
कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नेवासा येथील सुप्रसिद्ध डॉ. मनीषा वाघ होत्या. प्रथमतः क्रांतिकारक सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी मान्यवरांचा सत्कार व त्यांची मनोगते झाली. यावेळी डॉ. मनीषा वाघ यांनी मनोगतामध्ये महिलांना घरातील कामे करताना आपल्या आरोग्याची काळजी कशी घ्यावी याबद्दल मार्गदर्शन केले. त्यानंतर महिला पालक यांनी खेळामध्ये सहभाग घेऊन हळदी कुंकवाच्या कार्यक्रमाचा आनंद घेतला. स्पर्धेमध्ये विजेत्या महिला पालकांना विशेष पारितोषिक देण्यात आले. कार्यक्रम प्रसंगी डॉ. मनीषा वाघ यांनी विद्यार्थ्यांना हनुमान चालीसा पुस्तके भेट म्हणून दिली व त्याचे वाचन करण्यास प्रोत्साहन दिले.
धावपळीच्या काळातही महिला पालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याबद्दल संस्थेच्या अध्यक्षा सुरेखाताई टेमक यांनी महिला पालकांचे विशेष आभार मानले.
कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्य भारती कुदळे व सर्व महिला शिक्षक यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन ज्योती कोलते यांनी केले.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय –कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, Emal ID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

दैनिक राष्ट्र सह्याद्री
च्या शिर्डी विभागीय कार्यालयास आमच्या हार्दिक शुभेच्छा..!

लक्ष्मी इंग्लिश मिडियम पब्लिक स्कूल, विखरणी
लक्ष्मी ग्रामीण सह.पतसंस्था,
ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना परिपूर्ण शिक्षण देणारी एकमेव संस्था
सचिव
अध्यक्ष
* शुभेच्छुक *
सौ.ज्योती मोहन शेलार
ग्रामपंचायत सदस्या, विखरणी
डॉ. मोहन खंडू शेलार

दैनिक राष्ट्र सह्याद्री
च्या शिर्डी विभागीय कार्यालयास आमच्या हार्दिक शुभेच्छा..!
श्री. विजय कोते
श्री. पंकज लोढा
साई निर्माण ग्रुप, शिर्डी
साई कुबेर डेव्हलपर्स, कोपरगाव
सर्व सन्माननीय सदस्य, साई निर्माण ग्रुप

दैनिक राष्ट्र सह्याद्री
च्या शिर्डी विभागीय कार्यालयास आमच्या हार्दिक शुभेच्छा..!
साई माउली ट्रेडर्स
आमच्याकडे सर्व प्रकारचा भुसार माल खरेदी विक्री केली जाईल.
प्रॉप्रा. नवनाथ आनंदा वाबळे पा.
प्रोप्रा. निता नवनाथ आनंदा वाबळे पा.
साई माउली वेब्रिज
६० पाणी वजन काटा
साई आराध्य ॲक्वा
योग्य TDS थंड पाण्याचे जार मिळतील.
साई माउली फ्लोअर मिल
मका, गहू, बिट्टी, भरडा तयार करून मिळेल.

दैनिक राष्ट्र सह्याद्री
च्या शिर्डी विभागीय कार्यालयास आमच्या हार्दिक शुभेच्छा..!
श्री. ओमेश साहेबराव जपे (सरपंच)
श्री. विकास नानासाहेब जपे (उपसरपंच)
* शुभेच्छुक *
श्री. दत्तात्रय जिजाबा आगलावे (सदस्य)
सौ. सुजाताताई अमोल भोसले (सदस्य)
श्री. सागर राजेंद्र आरणे (सदस्य)
श्री. गणेश एकनाथ आगलावे (सदस्य)
सौ. शैलाताई महेंद्र पवार (सदस्य)
सौ. सुवर्णाताई प्रदीप नितनवरे (सदस्य)
श्री. संतोष विश्वनाथ कसबे (सदस्य)
सौ. मिनाताई छबु बनसोडे (सदस्य)
सौ. रुपालीताई संजय जपे (सदस्य)
श्री. दिलीप मंजाहारी गायकवाड (सदस्य)
सौ. अनुजा आनंद जपे (सदस्य)
सौ. केशरबाई गणपत सदाफळ (सदस्य)
श्री. आशिष कैलास आगलावे (सदस्य)
सौ. आशाताई पुनमचंद कोठारी (सदस्य)
श्री. कार्ले भाऊसाहेब (ग्रामविकास अधिकारी)
ग्रामपंचायत सावळीविहीर बु. ता. राहाता, जि. अहिल्यानगर

दैनिक राष्ट्र सह्याद्री च्या शिर्डी विभागीय कार्यालयास आमच्या हार्दिक शुभेच्छा!
ग्रामपंचात कार्यालय सावळीविहीर खुर्द
सौ. अर्चना दत्तात्रय क्षिरसागर - सरपंच
श्री. रविंद्र रमेश पंडीत - उपसरपंच
श्री. अशोक श्रीपत जमधडे - सदस्य
सौ. सपनाताई सुधीर वर्पे - सदस्य
श्री. महेश भास्करराव जमधडे - सदस्य
सौ. सुजाताताई महेश जमधडे - सदस्य
श्री. शरद भाऊसाहेब भदे - सदस्य
सौ.महिमा साईनाथ झिंजाड - सदस्य
सौ. संघमित्रा बबन अहिरे - सदस्य
सौ. रेखा रमेश पवार - सदस्य
श्रीमती पी.जे. टेमक - ग्रामविकास अधिकारी
सर्व कर्मचारी वृंद समस्त ग्रामस्थ
समस्त ग्रामस्थ सावळीविहीर, खुर्द ता. राहाता जि. अहिल्यानगर

राष्ट्र सह्याद्री च्या शिर्डी विभागीय कार्यालयास आमच्या हार्दिक शुभेच्छा!
9168101102
डॉ. चौधरी मेंदु व मणके विकार हॉस्पिटल
Dr.Chaudhari Brain & Spine HOSPITAL
डॉ. मुकुंद अर्जुन चौधरी
MBBS.MS, Mch (Neurosurgery)
डोकेदुखी * पॅरालिसीस * अपघात * मणके विकार ब्रेन ट्युमर * फिट्स

दैनिक राष्ट्र सह्याद्री च्या शिर्डी विभागीय कार्यालयास आमच्या हार्दिक शुभेच्छा!
DRONA ACADEMY (Govt. Approved School)
अशोकराव दामोधर दंडवते पाटील ग्रामीण शैक्षणिक प्रतिष्ठान चे
द्रोणा अकॅडमी, साकुरी
द्रोणा कॉलेज सायन्स अँड कॉमर्स, साकुरी
सौ. प्राजक्ताताई जयराज दंडवते(संचालिका)
श्री .अनुप अशोकराव दंडवते पाटील (उपाध्यक्ष)
अनिता श्रीकांत रोहोम (प्राचार्या)
कार्यकारी विश्वस्त
प्रवेश सुरु.. लिमिटेड सिटस्
शैक्षणिक सुविधा :-
- निसर्गरम्य परिसर
- प्रशस्त हवेशीर वर्ग
- पुर्णपणे सुसज्ज संगणक प्रयोगशाळा
- अनुभवी व प्रशिक्षित शिक्षक
- विद्यार्थी योग्य शिक्षक प्रमाण
- क्रिया-कौशल्य आधारित शिक्षक
- योग, ध्यान, व आध्यात्मिकतेसह संस्कृत श्लोक
- स्पर्धा परिक्षांचे विशेष प्रशिक्षण (ऑलिम्पियाड, होमी भाभा, शिष्यवृत्ती)
- सीसीटीव्ही देखरेखीखाली कॅम्पस
JEE व NEET परीक्षांची तयारी, यासाठी खास तज्ञांचे मार्गदर्शन..!
श्री.जयराज अशोकराव दंडवते पाटील (अध्यक्ष)
9011798599 | 7350002010
dronacbse@rediffmail.com
dronaacademy.co.in
कृषी उत्पन्न बाजार समितीचे मागे, नगर-मनमाड हायवे, साकुरी, ता. राहाता, जि. अहिल्यानगर

दैनिक राष्ट्र सह्याद्री
च्या शिर्डी विभागीय कार्यालयास आमच्या हार्दिक शुभेच्छा!
साई भक्त फकीरचंद लोढा
माजी उपसरपंच ग्रामपंचायत, रुई । श्री साईबाबा प्रतिष्ठाण, रुई

राष्ट्र सह्याद्री च्या शिर्डी विभागीय कार्यालयास आमच्या हार्दिक शुभेच्छा!
हॉटेल आठवण
व्हेज नॉन व्हेज जेवणाचे माहेरघर
स्पेशल कंदुरी मटण
प्रॉपा. सचिनराव बनसोडे
राहता (साकुरी) नगर पालिका रोड साकुरी

राष्ट्र सह्याद्री च्या शिर्डी विभागीय कार्यालयास आमच्या हार्दिक शुभेच्छा!
श्री साई छत्र
केटरिंग सर्व्हिसेस
असंख्य ग्राहकांना तृप्त, करून टाकणारी चव
ठिकाण – लोणी संगमनेर रोड लोणी
प्रोप्रा. गणपत शेठ भोसले

दैनिक राष्ट्र सह्याद्री
च्या शिर्डी विभागीय कार्यालयास आमच्या हार्दिक शुभेच्छा!
डॉ.स्वाधीन मंगला किसनराव गाडेकर
नगराध्यक्ष – नगरपालिका राहाता

## पान १ वरुन

# ड्रग्स तस्करीतला 'माऊली' खा. लंकेचा कार्यकर्ता!

दोन दिवसांपूर्वी सिस्पे-इन्फिनीटी प्रकरणात आपले नाव जाणीवपूर्वक गोवले गेल्याचे लंके यांनी सांगितले होते. तसेच, पारनेरला बदनाम करण्याचा विरोधकांचा डाव असल्याचे त्यांचे म्हणणे होते. मात्र, आता मुख्य आरोपीसोबतचे फोटो व्हायरल झाल्याने चर्चांना उधाण आले आहे.

विखे पाटलांनी आणखी एक गंभीर आरोप केला की, माऊली शिंदेचे नाव आरोपपत्रात येऊ नये म्हणून एक नेता अर्धा तास पोलिस ठाण्यात बसलेला होता. त्यामुळे 'हा नेता कोण?' या चर्चाही सुरू झाल्या आहेत. खासदार लंके यांचे यापूर्वीही कुख्यात आरोपींसोबतचे फोटो व्हायरल झाले आहेत. पुण्यातील डॉन गज्या मारणेचा सत्कारही त्यांनी स्वीकारला होता. सिस्पेचे संचालक हे आपले पाहुणे असल्याचे वक्तव्यही त्यांनी केले होते, ज्यांच्यावर नंतर शेकडो कोटींच्या घोटाळ्याचा आरोप झाला. आता ड्रग्ज प्रकरणातील आरोपीसोबतचे फोटो व्हायरल झाल्याने लंके पुन्हा चर्चेत आले आहेत. तो मी नव्हेच ही भूमिका घेणाऱ्या लंके यांनी या फोटोंबाबत प्रतिक्रिया द्यावी, अशी मागणी महायुतीच्या कार्यकर्त्यांकडून होत आहे.

# मुलाकडून बापाची फसवणूक !

## शेती विक्रीतील २ कोटी ७ लाखांचा अपहार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर** : मुलानेच माझा विश्वासघात केला अशी हृदयद्रावक तक्रार ८२ वर्षीय शेतकरी अब्दुलगणीखान फाजलखान पठाण (रा. काजीपुरा, गंगापूर) यांनी गंगापूर पोलीस ठाण्यात दाखल केली असून, शेती विक्री व्यवहारातील तब्बल २ कोटी ७ लाख रुपयांचा अपहार केल्याचा गंभीर आरोप त्यांनी आपला मुलगा मुसाखान पठाण व सून परवीन पठाण यांच्यावर केला आहे.

पठाण यांची मौजे भेंडाळा शिवारातील गट नं. २१४ मधील १२ हेक्टर ४७ आर जमीन त्यांनी विक्रीस काढली होती. या व्यवहारासाठी मुलगा मुसाखान याने अनिल ठोंबरे व मयूर टेटवार या खरेदीदारांची ओळख करून दिली. तोंडी व्यवहारानुसार जमीन ४ कोटी १० लाख रुपयांत विकण्याचे ठरले.

दि. १७ नोव्हेंबर २०२५ रोजी गंगापूर येथील वलीनगर भागात झालेल्या बैठकीत अनिल ठोंबरे यांनी २ कोटी ७ लाख रुपये रोख स्वरूपात मुसाखान पठाण याच्याकडे दिले. बँक बंद आहे, उद्या खात्यावर जमा करतो असे सांगून मुसाखानने वडिलांचा विश्वास संपादन केला व पैसे स्वतःकडेच ठेवले.

पुढील चौकशीत धक्कादायक प्रकार उघड झाला. वृद्ध पठाण यांच्या नावाने वैयक्तिक खाते नसून, मुलाने त्यांच्या नकळत संयुक्त खाते उघडले असल्याचे समोर आले. त्या खात्यात फक्त १ कोटी १ लाख रुपयेच जमा असल्याचे दिसून आले. उर्वरित रक्कम स्वतःच्या व पत्नीच्या खात्यावर जमा केल्याचा आरोप आहे.

वारंवार पैशांची मागणी करूनही मुसाखान टाळाटाळ करत असल्याने अखेर तो पत्नीसमवेत बेपत्ता झाला. याबाबत ६ डिसेंबर २०२५ रोजी गंगापूर पोलीस ठाण्यात बेपत्ता तक्रार दाखल करण्यात आली होती.पुन्हा गंगापूरमध्ये आल्यानंतरही मुसाखानने पैसे परत न केल्याने आता वृद्ध बापाने स्वतःच्या मुलाविरुद्ध फसवणुकीची तक्रार दाखल केली आहे. या प्रकरणामुळे मुलाकडून बापाची फसवणूक हा प्रकार शहरात चर्चेचा विषय ठरला असून पोलीस यंत्रणा पुढील तपास करत आहे.

## निधन वार्ता

### सुगंधाबाई आंबरे



**गणोरे** - येथील बाळासाहेब तबाजी आंबरे यांच्या पत्नी सुगंधाबाई बाळासाहेब आंबरे यांचे वयाच्या ६२ व्या वर्षी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले.त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा तीन मुली, सुना, नातू, पतवंडे व जावई असा मोठा परिवार आहे. बाळासाहेब तबाजी आंबरे याच्या पत्नी व योगेश बाळासाहेब आंबरे यांच्या त्या आई होत.

# पुरूषोत्तम कराड यांची राष्ट्रपती पदकासाठी निवड.



**ढोरजळगांव** : शेवगाव तालुक्यातील ढोरजळगावचे भूमिपुत्र व सध्या मुंबई सायबर गुन्हे शाखेत पोलीस उपायुक्त म्हणून कार्यरत असलेले पोलीस अधिकारी पुरुषोत्तम नारायण कराड यांची यावर्षीच्या भारत सरकारच्या राष्ट्रपती पदकासाठी निवड झाली आहे. शेतकरी कुटुंबातून आलेल्या कराड यांनी २००२ साली लोकसेवा आयोगाद्वारे डीवायएसपी म्हणून सेवेत प्रवेश केला. गोंदिया, सोलापूर, गडचिरोली व नवी मुंबईसह विविध जिल्ह्यांमध्ये कार्यरत राहताना गुन्हेगारी नियंत्रण, आपत्ती व्यवस्थापन, महिलांविरोधातील गुन्हे, तक्रार निवारण या क्षेत्रात त्यांनी लक्षणीय योगदान दिले. अनेक संवेदनशील प्रकरणांचा यशस्वी तपास, शिस्तप्रिय कार्यपद्धती व जनसामान्यांशी सुसंवाद हे त्यांचे वैशिष्ट्य मानले जाते. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून २०१० मध्ये डीसीपी, तर २०१४ मध्ये आयपीएस पदावर त्यांची पदोन्नती झाली. यापूर्वीही त्यांना अंतर्गत सुरक्षा, खडतर सेवा व फोर्स वन अशी अनेक सरकारी पदके मिळाली आहेत. राष्ट्रपती पदकासाठी झालेल्या निवडीबद्दल शेवगाव तालुक्यात व ढोरजळगाव परिसरात त्यांचे अभिनंदन होत आहे.

# पशुपक्ष्यांसाठी पाच एकर ज्वारीचे क्षेत्र राखून

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**दिवे** : मानवाच्या हस्तक्षेपामुळे दिवसेंदिवस निसर्गाचा ऱ्हास होत चालला आहे. परिणामी निसर्गाचा समतोल बिघडत चालला आहे त्यामुळे पशुपक्षी यांची संख्या कमालीची घटली आहे परंतु दिवे परिसरात पक्षांचा किलबिलाट पुन्हा ऐकू येत आहे. दिवे परिसरातील काळेवाडी (ता. पुरंदर ) येथील शेतकरी सागरतात्या काळे व वृषाली काळे या दाम्पत्याने पशुपक्ष्यांच्या चारापाण्यासाठी स्वत:च्या शेतातील पाच एकर ज्वारी न काढण्याचा निर्णय घेतला आहे काळे यांची मल्हारगड परिसरात शेती आहे दिवे परिसरात यावर्षी पावसाचे प्रमाण चांगले होते त्यामुळे हा परिसर हिरवाईने नटला आहे. मल्हारगड परिसरात वनराई देखील मोठ्या प्रमाणात आहे त्यामुळे पशुपक्ष्यांचा मुक्त संचार पाहायला मिळत आहे परंतु तीव्र उन्हाळ्यात पशुपक्ष्यांना



अन्न-पाण्याची कमतरता भासू नये हे लक्षात घेऊन स्वत:च्या शेतातील ज्वारी सोडून देऊन सार काळे व वृषाली काळे या दाम्पत्याने सर्वांपुढे आदर्श ठेवला आहे. काळे यांच्या या निर्णयाला वडील पंढरीनाथ काळे यांनी देखील अनुमती दर्शविल्यामुळे आज जवळजवळ पाच एकर जमिनीवर असलेली ज्वारी राखण न करता पाखरे न हुसकावण्याचा निर्णय घेतल्याने हजारो चिमण्या व इतर पक्षी या ज्वारीवर ताव मारून पाणी पिऊन भुर्रर्रर उडून जाताना दिसत आहेत. पशुपक्षी याठिकाणी थव्याथव्याने पाहावयास मिळत आहेत.

# सासवड एस टी आगारात चालक दिन साजरा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**माळशिरस** : २४ जानेवारी हा चालक दिन सासवड येथील आगारात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या निमित्ताने विना अपघात सेवा देणाऱ्या पाच चालकांचा सत्कार करण्यात आला. आगार प्रमुख सागर गाडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास प्रवासी संघटनेचे तानाजी सातव व ॲड अमोल जगताप विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. शशिकांत चव्हाण, संजय कामथे सुनिल राऊत, सुनील जगताप व सुदाम थोरात या पाच चालकांचा यावेळी मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सुरक्षित सेवा देणारे तसेच चांगले केपीटीएल देणाऱ्या सेवकांचा या प्रसंगी सत्कार करण्यात आला ॲड अमोल जगताप यांनी या कार्यक्रमाबद्दल कौतुक करत चालकांचे अभिनंदन केले. सागर गाडे यांनी या दिनाचे महत्व, चालकांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याची भूमिका, चालकांचे कष्ट, प्रवाशांना इच्छित स्थळी सुरक्षित पोहचवणे यावर भाष्य करत कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले संघटनेचे माजी अध्यक्ष नितीन ओंबळे यांनीही यावेळी मनोगते व्यक्त केले. पोपट जैनक यांनी सुत्र संचालन केले तर दत्तात्रय मदने यांनी आभार मानले.मनीषा भोईटे, लक्ष्मी गायकवाड, अमित वाल्मिकी,रुपाली गिरमे, ज्योत्स्ना कवळे, प्रतीक्षा यादव यांसह अनेक चालक, वाहक, कार्यशाळा कर्मचारी या प्रसंगी उपस्थित होते.

# विविध योजनांच्या अनेक पेन्शन प्रकरणे मंजुर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : तालुक्यातील केसापूर व आंबी परिसरातील आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या गोरगरीब महिला व पुरुषांसाठी श्रावण बाळ सेवा योजना, विधवा महिला योजना, निराधार योजना तसेच अपंग व्यक्ती योजनांच्या अनेक पेन्शन (डोला) प्रकरणांना अखेर मंजुरी मिळाल्याने गोरगरिबांना मोठा मिळाला असून त्यांच्यामध्ये समाधानाचे वातावरण पसरले आहे.

यामध्ये लाभार्थ्यांची प्रकरणे आवश्यक ती सर्व कागदपत्रे पूर्ण करून ऑनलाईन पद्धतीने दाखल करण्यात आली होती. मात्र, काही कारणास्तव प्रकरणे प्रलंबित होती. या संदर्भात केसापूरचे माजी सरपंच दिपक पवार यांनी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करून राज्याचे जलसंधारण मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे यांच्याकडे प्रकरण मांडले.

ना. विखे पाटील यांनी या पेन्शन प्रकरणांना तातडीने मंजुरी देण्याचे स्पष्ट निर्देश संबंधित यंत्रणेला दिले. विशेष म्हणजे, पायाला फ्रॅक्चर झालेला असतानाही वॉकरच्या सहाय्याने चालत माजी सरपंच दिपक पवार यांनी लाभार्थ्यांसाठी केलेला पाठपुरावा अखेर यशस्वी ठरला.



यासाठी प्रशासनाचे मोलाचे सहकार्य लाभले आहे. या पेन्शन (डोला) प्रकरणांच्या मंजुरीसाठी राहुरीचे तहसीलदार डॉ. अमित पवार, निवासी नायब तहसीलदार संध्या दळवी,अव्वल कारकून नंदा मकासरे,अव्वल कारकून वाघ, आयटी असिस्टंट मंगेश साठे,संजय गांधी योजनेचे अधिकारी,महसूल सहायक मालकर यांनी या कामी विशेष सहकार्य केले.

यावेळी लाभार्थ्यांना मंजुरी पत्रांचे वितरण करण्यात आले आणि मंजूर झालेल्या सर्व लाभार्थ्यांना पेन्शन (डोला) मंजुरीची अधिकृत पत्रे वाटप करण्यात आली. यावेळी माजी सरपंच दिपक पवार यांनी सर्व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांचे आभार व्यक्त केले.

या निर्णयामुळे परिसरातील वृद्ध, विधवा, निराधार व अपंग लाभार्थ्यांना नियमित आर्थिक आधार मिळणार असून, त्यांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडणार आहे.

# आकारी पडिक जमिनींच्या वाटपाविरोधात शेतकऱ्यांचे निवेदन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : छत्रपती संभाजी नगर उच्च न्यायालयाच्या निकालानुसार शासनाने आकारी पडिक मुळ मालकांचे वारसदारांना अगोदर वाटप करून उर्वरित जमिनी रोजगार निर्मितीसाठी खुशाल कंपन्यांना द्याव्यात. या निर्णयास विरोध दर्शविण्यासाठी आज २६ जानेवारी रोजी दुपारी २ वाजता श्रीरामपूर प्रांताधिकारी यांना अँड अजित काळे यांचे मार्गदर्शनाखाली आकारी पडिक शेतकरी निवेदन देणार आहेत. प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात आकारी पडीक समितीने म्हटले आहे की छत्रपती संभाजीनगर उच्च न्यायालयाचे निकालानंतर सातत्याने सरकारने प्रत्येक वेळेस आश्वासन दिले की सदर अकारी पडित शेतजमिनी शेतकऱ्यांना लवकरच सुटतील सदरची कार्यवाही ही अंतिम टप्प्यात आहे. राज्यपालांनी त्याला मान्यता दिल्यानंतर जमिनी वाटपाची प्रक्रिया चालू होईल. अकारी पडित संघर्ष समिती सातत्याने मुंबई, पुणे ,नागपूर या ठिकाणी संबंधित मंत्री महोदयासमोर जाऊन चर्चा करत आली आहे आणि त्याच्यातून आश्वासन देऊन जवळपास आता एक वर्ष होऊन गेले आहे तरीही शासनाची जी भूमिका आहे ती दुटप्पीपणाची वाटायला लागली आहे.

सदर हरेगाव मळ्याच्या जमिनी ह्या शेती कसण्यायोग्य आहे. शेती महामंडळाची ज्यावेळेस निर्मिती झाली त्यावेळेस ह्या जमिनी फक्त आणि फक्त ऊस पिक उत्पादन करण्यासाठीच वापरण्यात याव्यात असे स्पष्ट निर्देश महामंडळ अस्तित्वात आल्यानंतर शासनाने दिले होते. परंतु आता उच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे ह्या जमिनी सरकार शेतकऱ्यांना देणे ऐवजी मोठ्या धन दांडग्या उद्योजकांना की ज्या उद्योजकांचं पूर्वीच अस्तित्व माहित नाही अशा लोकांना या जमिनी कंपनीच्या नावाखाली प्रकल्प निर्मिती साठी देत आहेत. असं झाल्यास आम्ही सर्व अकारी पडित शेतजमीन लाभधारक वारस शेतकरी प्रचंड मोठ्या प्रमाणात विरोध करतोय जर महाराष्ट्र शासनाने हा निर्णय तात्काळ बदलला नाही. किंबहुना शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काच्या जमिनी वाटून उरलेल्या जमिनी संदर्भात निर्णय घ्यायला शासन मोकळे आहे परंतु सदर जमिनी शेतकऱ्यांना वाटण्याच्या आधी शासनाने त्रयस्थ व्यक्ती किंवा उत्पादक कंपनीस देण्याचा प्रयत्न केला तर त्याला श्रीरामपूर तालुक्यातील शेतकरी मोठ्या प्रमाणात विरोध करतील.

# मोफत मोतीबिंदू तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराचे उदघाट्न

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कुकाणा** : नेवासा तालुक्यातील कुकाणा येथील आर्ले हेल्थकेअर व इनलॅक्स बुधराणी हॉस्पिटल के.के.आय इन्स्टिट्यूट कोरेगाव पार्क पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार (दि. २५ ) रोजी मोफत मोतीबिंदू तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. भेंडा बु. येथील नूतन सरपंच सुहासिनी किशोर मिसाळ यांच्या शुभहस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले त्यावेळी यावेळी डॉ. गणेश आर्ले, आर्ले पतसंस्थेच्या अध्यक्षा मीना आर्ले उपस्थित होत्या. मान्यवरांचे आर्ले हेल्थ सेंटरच्या वतीने डॉ गणेश आर्ले यांनी सत्कर केले. सरपंच सुहासिनी मिसाळ यांनी कार्यक्रमाला शुभेच्छा दिल्या. यावेळी मिरा पटारे व ऑप्टोमेट्रिस्ट अजय झिरपे यांनी दोनशेहुन अधिक रुग्णांची वैद्यकीय तपासणी केली.त्यातील २८ रुग्णांची शस्त्रक्रिया करण्यासाठी निवड करण्यात आली.

# ज्ञानेश्वरीचे तत्वज्ञान समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचले पाहिजे : प्रशांत कुऱ्हाडे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आळंदी** : विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मूल्यशिक्षण आणि संस्कारांची नितांत गरज असताना संत ज्ञानेश्वर महाराजांचे विचार आणि ज्ञानेश्वरीचे तत्वज्ञान समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचले पाहिजे, असे मत आळंदी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे यांनी व्यक्त केले. 'ओळख श्री ज्ञानेश्वरीची' उपक्रमांतर्गत आयोजित दोन दिवसीय राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.






यावेळी आचार्य सागर महाराज देशमुख, आळंदी देवस्थानचे विश्वस्त चैतन्य महाराज कबीर, ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुरेश वडगांवकर, सचिव अजित वडगांवकर, श्री ज्ञानेश्वर महाराज चरीत्र समितेचे अध्यक्ष प्रकाश काळे, दिपक पाटील, आळंदी नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्ष सुजाता तापकीर, नगरसेवक आदित्य घुंडरे, सागर कुऱ्हाडे, ऋतुजा घुंडरे, सोमनाथ कुऱ्हाडे, अक्षय कुऱ्हाडे, संजय घुंडरे, आनंद बोरुंदिया उपस्थित होते.

आळंदी ही संत ज्ञानेश्वर महाराजांची भूमी असून येथून ज्ञानेश्वरीचा विचार देशभर पोहोचण्याची ऐतिहासिक जबाबदारी आपल्यावर आहे, असे सांगत नगराध्यक्ष कुऱ्हाडे यांनी यापुढे आळंदी नगरपालिकेच्या शाळांमध्ये 'ओळख श्री ज्ञानेश्वरीची' हा उपक्रम राबविण्यात येईल, तसेच या कार्यात नगरपालिका सर्वतोपरी सहकार्य करेल, अशी ग्वाही दिली. या उपक्रमात अन्य शैक्षणिक संस्था, सामाजिक संघटना आणि स्थानिक स्वराज्य संस्थांनीही सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले. प्रास्ताविकात अजित वडगांवकर यांनी गेल्या पाच वर्षांत हा उपक्रम एका शाळेपुरता मर्यादित न राहता 'ओळख श्री ज्ञानेश्वरीची' असा व्यापक परिवार निर्माण झाल्याचे स्पष्ट केले. या स्पर्धेत राज्यभरातून सुमारे ४०० विद्यार्थ्यांनी ज्ञानेश्वरीतील जीवनमूल्ये, विद्यार्थी जीवनातील आचार-विचार, विवेक व मानवता या विषयांवर प्रभावी वक्तृत्व सादर केले.

# यशवंत सामाजिक प्रतिष्ठानचे पुरस्कार जाहीर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**नेवासा** : यशवंत सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणाऱ्या व प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या यंदाचे कृतज्ञता पुरस्कार संपादक राजीव खांडेकर, डॉ संदीप वासलेकर, प्रा. डॉ रंगनाथ पठारे यांना जाहीर झाले आहेत. शनिवार दि.३१जानेवारी रोजी सायंकाळी ४ वाजता या पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार असल्याची माहिती यशवंत सामाजिक प्रतिष्ठानचे मार्गदर्शक माजी मंत्री शंकरराव गडाख यांनी दिली आहे. राज्यातील सामाजिक क्षेत्रात रचनात्मक कार्य करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांना यशवंत सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने दरवर्षी कृतज्ञता पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते. राज्यातील मोजक्याच प्रतिष्ठेच्या पुरस्कारांमध्ये याचा समावेश होतो. सोनई येथील मुळा पब्लिक स्कूलच्या प्रांगणात ज्येष्ठ साहित्यिक मा खासदार यशवंतराव गडाख यांच्या अध्यक्षतेखाली पुरस्कार वितरणाचा सोहळा संपन्न होणार आहे. कृतज्ञता पुरस्काराचे मानकरी राजीव खांडेकर हे भारतातील एक प्रख्यात मराठी पत्रकार, संपादक आणि मीडिया स्ट्रॅटेजिस्ट आहेत तर डॉ संदीप वासलेकर हे एक आंतरराष्ट्रीय विचारवंत, लेखक आणि सार्वजनिक धोरणांचे विश्लेषक आहेत. रंगनाथ पठारे हे साहित्यिक, लेखक आणि पत्रकार आहेत. त्यांच्या कथा, कादंबऱ्या आणि लेखनातून सामाजिक-सांस्कृतिक विषयांचे प्रभावी विश्लेषण त्यांनी केले आहे.

विविध क्षेत्रात योगदान देणाऱ्या अशा मान्यवरांच्या आयुष्याचा प्रवास हा जिद्दीचा व सातत्याचा असतो म्हणूनच तरुणांनी, नागरिकांनी अधिकाधिक संख्येने या कार्यक्रमाचा लाभ व प्रेरणा घ्यावी असे आवाहन यशवंत सामाजिक प्रतिष्ठानचे मार्गदर्शक माजी मंत्री शंकरराव गडाख यांनी केले आहे.


**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY OLD NAME
VASIM BASARAT PINJARI
(NAME AS PER SCHOOL DOCUMENTS)
TO NEW NAME AS
VASIM BASHARAT PINJARI
VIDE AADHAR NO.
6490 2379 2340


# खोटे सोने देऊन फसवणूक करणारी टोळी सक्रिय

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**निरगुडसर** :सोन्याचे भाव गगनाला भिडल्याने स्वस्तात सोने देतो म्हणून महिलांची फसवणूक करणारी टोळी आंबेगाव तालुक्यात फिरत असून पाच महिन्यापूर्वी अवसरी खुर्द येथील एका तरुणांना खोटे सोने देऊन दोन लाख रुपयांची फसवणूक केल्याची घटना घडली आहे. त्यामुळे स्वस्तात सोने मिळते म्हणून आमिषाला बळी पडू नये आपल्या दारात कोणी सोने घेऊन आल्यास ताबडतोब मंचर पोलीस स्टेशनला कळवावे असे आवाहन मंचर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्रीकांत कंकाळ यांनी केले आहे.

अवसरी खुर्द ता. आंबेगाव येथे सात दिवसापूर्वी एक तरुण सोन्याची खोटी चीप घेऊन एका हॉटेल व्यवसायिक महिलेकडे आला व ५० हजार रुपयांना मी तुम्हाला सोन्याची चीप देतो असे म्हणत फसवणूक करु लागला मात्र हॉटेल व्यवसाइक महिलेला शंका आल्याने तिने हे सोने सोनाराच्या दुकानात जाऊन तपासू असे सांगितले असता सदर तरुणाने हॉटेलमधून पळ काढला. त्यामुळे या महिलेने गावातील महिलांची फसवणूक होऊ नये म्हणून रस्त्यावर फिरणाऱ्या महिला व तरुणांकडून सोने खरेदी करू नये आपली फसवणूक टाळावी असे आवाहन केले.

तसेच पाच महिन्यापूर्वी दोन व्यक्ती मोटरसायकल वर अवसरी खुर्द येथील एका दुकानदारांकडे दीड किलो खोट्या सोन्याची माळ घेऊन आले. त्या माळे पैकी एका माळेतून दोन सोन्याचे खरे मनी दिले व म्हणाले तुम्ही सोनाराकडे चेक करून पहा मगच आमच्याकडून सोन्याचे दागिने घ्या असे म्हणाले. सदर व्यक्तीने दुकानात जाऊन मनी तपासले असता ते खरे होते त्यामुळे त्या दोघांवर विश्वास बसला त्यावेळी दुकानदाराने एवढे दागिने आपण आणले कुठून असे विचारले असता त्या व्यक्तीने आम्ही जुनी घरे पाडायला घेतो आम्हाला नारायणगाव येथे जुने घर पाडताना सोन्याचा डबा सापडला आहे त्यातून तुम्हाला हे दागिने देतो असे सांगीतले. तसेच तूम्ही संगमनेरला पाच लाख रुपये घेऊन या असे सांगितले. सदर दुकानदाराने आमच्याकडे लगेच एवढे पैसे नाहीत सध्या तुम्हाला दोन लाख रुपये देतो अशा प्रकारे सौदा ठरला. नंतर दुकानदार संगमनेरला गेला असता तेथे एसटी स्टँडवर फसवणूक करणारे दोघेजण आले त्यांनी दोन लाख रुपये घेतले व दुकानदाराला दीड किलो वजनाच्या खोट्या सोन्याच्या माळा दिल्या व ते निघून गेले. त्यानंतर सदर फसवणूक करणाऱ्या दोघा व्यक्तींनी मोबाईल बंद केल्याने दुकानदाराला फसवणूक झाल्याची शंका निर्माण झाली. त्यानंतर मंचर येथील सराफा दुकानात सोने खरे की खोटे खात्री करण्यासाठी गेले असता दीड किलो सोन्याच्या माळा खोटे असल्याची खात्री झाली. संबंधित दुकानदार मंचर पोलीस स्टेशनला गेले व सर्व घटनाक्रम सांगितला. पोलिसांनी ज्यावेळी तक्रार नोंदवण्यासाठी सांगीतले त्यावेळी मात्र बदनामी होईल म्हणून सदर दुकानदाराने तक्रार दिली नाही.

## नशिबाची परिक्षा

**सोमवार दि.२६ जानेवारी २०२६**

### मिलनम डे

उदय-अस्त | सिंगल ५-१-९ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| १४९ २४८ २२० | ४-० | १९० २८० २२६ | जोड ४१-९०-६३-७५-०२ |

### कल्याण

उदय-अस्त | सिंगल ९-४-५ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| १६९ १५० ३३० | ६-४ | १५८ ६८० ७७० | जोड ६०-१४-२३-७५-४८ |

### मुंबैम (मेन)

उदय-अस्त | सिंगल ४-७-९ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| १७० १८९ ११६ | ८-२ | १५६ १२९ ११० | जोड ८६-४२-७१-३९-२५ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 06/10/2025 to 10/10/2025 | 890 71 678 | 160 71 470 | 457 61 236 | 569 09 270 | 690 58 459 |
| 13/10/2025 to 17/10/2025 | 157 38 468 | 688 20 136 | 358 64 248 | 500 54 266 | 125 85 168 |
| 20/10/2025 to 24/10/2025 | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** |
| 27/10/2025 to 31/10/2025 | 190 06 150 | 457 64 167 | 247 36 330 | 490 32 156 | 130 48 170 |
| 03/11/2025 to 07/11/2025 | 127 04 266 | 259 63 256 | 799 52 679 | 244 00 389 | 490 32 138 |
| 10/11/2025 to 14/11/2025 | 356 40 479 | 900 92 237 | 279 89 667 | 350 81 137 | 579 10 280 |
| 17/11/2025 to 21/11/2025 | 156 29 135 | 190 05 799 | 460 03 490 | 233 87 269 | 149 43 256 |
| 24/11/2025 to 28/11/2025 | 335 19 900 | 689 35 690 | 247 38 800 | 120 36 150 | 116 81 678 |
| 01/12/2025 to 05/12/2025 | 688 20 488 | 460 00 145 | 128 17 223 | 168 57 377 | 239 45 177 |
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/12/2025 to 19/12/2025 | 120 37 359 | 233 86 169 | 237 27 557 | 378 80 578 | 134 85 500 |
| 22/12/2025 to 26/12/2025 | 220 41 470 | 160 76 466 | 600 67 469 | 680 47 340 | 336 27 368 |
| 29/12/2025 to 02/01/2026 | 259 63 599 | 340 75 348 | 250 71 344 | 136 05 140 | 123 64 699 |

* वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये *

द•ख•ल

## आत्मा मालिकमध्ये ३१ जानेवारीला मेस्टाचे राज्यस्तरीय अधिवेश

**कोपरगाव :** महाराष्ट्रातील इंग्रजी माध्यम शाळा चालवणाऱ्या संस्थाचालकांच्या एकमेव संघटना मेस्टाचे ११ वे राज्यस्तरीय अधिवेशन ३१ जानेवारी २०२६ रोजी शिर्डी येथील आत्मा मालिक ध्यानपीठ संस्था, कोकमठाण येथे आयोजित करण्यात आले आहे. या अधिवेशनात राज्यभरातील हजारो संस्थाचालक, शिक्षक व शिक्षणप्रेमी सहभागी होणार असल्याची माहिती संस्थापक अध्यक्ष डॉ. संजयराव तायडे पाटील यांनी दिली. अधिवेशनाचे उद्घाटन राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्या हस्ते होणार असून प्रमुख अतिथी म्हणून राज्याचे जलसंपदा मंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील उपस्थित राहणार आहेत. तसेच सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, शिक्षक मतदारसंघाचे आमदार किशोर दराडे, भाजप राज्य उपाध्यक्ष अनिल गावंडे, प्रदेश अध्यक्ष डॉ. नामदेवराव दळवी यांच्यासह राज्यभरातील पदाधिकारी, जिल्हाध्यक्ष, तालुकाध्यक्ष मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. शिक्षण क्षेत्रातील उत्कृष्टतेचा सन्मान हा अधिवेशनाचा मुख्य उद्देश आहे.

## सहविचार सभेत शिक्षक व शिक्षकेतरांचे प्रलंबित प्रश्न मार्गी

**अहिल्यानगर :** – जिल्ह्यातील माध्यमिक शाळांतील मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे विविध प्रलंबित प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने माध्यमिक शिक्षण विभागाचे अधिकारी व शिक्षक संघटनांची सहविचार बैठक रविवारी (दि. २५ जानेवारी) शिक्षक आमदार किशोर दराडे यांच्या अध्यक्षतेखाली शासकीय विश्रामगृह येथे पार पडली. या बैठकीत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या अनेक महत्त्वाच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

या बैठकीत पीएफच्या पावत्या व मेडिकल बिल मिळण्यास होत असलेल्या विलंबाबाबत महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. यासंदर्भात संबंधित प्रश्न तातडीने मार्गी लावण्यात आले असून, पुढील महिन्यापासून पीएफ पावत्या व मेडिकल बिल मिळण्यास सुरुवात होणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

## करंजी घाटात चार तास वाहतूक ठप्प

**पाथर्डी :** करंजी घाटात शनिवारी दुपारी पाथर्डीकडून दौंडकडे ऊस वाहून नेणारा ट्रक धोकादायक वळणावर बंद पडल्याने दुपारी दोन ते संध्याकाळी पाच वाजेपर्यंत वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली. ट्रक घाटाच्या मध्यभागी बिघडल्यानंतर दोन्ही बाजूंनी सुमारे पाच किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या. वेळेत पोलिस कर्मचारी न आल्याने प्रवासी, वाहनचालक, रुग्णवाहिका व अवजड वाहनांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला. नंतर एक पोलीस कर्मचारी आणि प्रवाशांच्या मदतीने वाहतूक सुरळीत करण्यात आली.

करंजी घाट मार्गे ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रकांची संख्या वाढल्याने अतिरीक्त वजनामुळे वारंवार ट्रक बंद पडत असून वाहतुकीत अडथळे निर्माण होत आहेत. घाटातील धोकादायक वळणांची दुरुस्ती व रुंदीकरण करण्याची मागणी प्रवाशांकडून सातत्याने होऊनही दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला. वारंवार अपघात व दुर्घटना टाळण्यासाठी प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

# नवीन न्यायालयाच्या इमारतीत

## अतिरिक्त मजल्याच्या बांधकामास मुख्यमंत्र्यांची मंजुरी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कर्जत :** मुंबई उच्च न्यायालयाने कर्जत येथे अतिरिक्त जिल्हा आणि सत्र न्यायालय स्थापन करण्यास मान्यता दिली असून दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) यांच्यासाठी नवीन बांधण्यात येणाऱ्या न्यायालयाच्या इमारतीमध्ये दोन न्यायालयीन कक्षांसह एक अतिरिक्त मजल्याच्या बांधकामासाठी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत विधान परिषदेचे सभापती प्रा राम शिंदे यांनी मागणी केली होती. त्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तात्काळ सकारात्मक प्रतिसाद देत उच्च न्यायालयाकडून प्रस्ताव प्राप्त होताच सदर इमारतीवर अतिरिक्त एक मजला बांधण्याच्या प्रस्तावावर आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्याची ग्वाही दिली आहे. याबाबत तत्कालीन कर्जत बार असोसिएशनचे अध्यक्ष अड कैलास शेवाळे यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली. यावेळी जेष्ठ विधीतज्ञ विलास गुंजाळ, नूतन सचिव ॲड.अविनाश मते उपस्थित होते.

मुंबई उच्च न्यायालयाने कर्जत जिल्हा अहिल्यानगर येथे अतिरिक्त जिल्हा आणि सत्र न्यायालय स्थापन करण्यास मान्यता दिली असून उच्च न्यायालयाच्या या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे कर्जत-जामखेड या दोन्ही तालुक्यांतील नागरिकांची आणि वकील बांधवांची मोठी सोय झाली आहे. व एकाच इमारतीमध्ये सर्व न्यायालय उपलब्ध होऊन पक्षकार यांचा वेळ वाचून न्याय निवड्यात अतिरिक्त वेळ जाणार नाही यासाठी कर्जत



बार असोसिएशनचे तत्कालीन अध्यक्ष अड कैलास शेवाळे यांनी विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांच्याकडे दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) यांच्यासाठी नवीन बांधण्यात येणाऱ्या न्यायालयाच्या इमारतीमध्ये दोन न्यायालयीन कक्षांसह एक अतिरिक्त मजल्याच्या बांधकामासाठी प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी २२ सप्टेंबर रोजी पत्र व्यवहार करीत पाठपुरावा केला होता. सभापती राम शिंदे यांनी देखील कर्जत-जामखेडच्या पक्षकारांच्या सुविधेसाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे या महत्वाच्या प्रश्नाकडे लक्ष वेधले होते. मुख्यमंत्री फडणवीस यांनी देखील यास सकारात्मक प्रतिसाद देत कर्जत दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) यांच्यासाठी नवीन बांधण्यात येणाऱ्या न्यायालयाच्या इमारतीमध्ये दोन न्यायालयीन कक्षांसह एक अतिरिक्त मजला बांधण्याबाबतचा प्रस्ताव प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालय अहिल्यानगर यांच्या स्तरावर विचाराधीन असून न्यायालयीन इमारत बांधकामाबाबतचे प्रस्ताव उच्च न्यायालयाकडून शासनास प्राप्त होत असतात. कर्जतसाठी उच्च न्यायालयाकडून सदरचा प्रस्ताव प्राप्त होताच कर्जत येथील इमारतीवर अतिरिक्त एक मजला बांधण्याच्या प्रस्तावावर आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्याची हमी दिली आहे. या मुख्यमंत्री फडणवीस यांच्या सकारात्मक पत्राने कर्जत बार असोसिएशनने मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासह सभापती राम शिंदे यांचे रविवारी पत्रकार परिषदेत आभार मानले.

**मुख्यमंत्री फडणवीस आणि सभापती राम शिंदे यांचे आभार : ॲड. कैलास शेवाळे**

एकाच इमारतीमध्ये सर्व न्यायालय उपलब्ध झाल्यास न्याय-निवाड्यात जलदगती मिळणार असून यासाठी आपण दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) यांच्यासाठी नवीन बांधण्यात येणाऱ्या न्यायालयाच्या इमारतीमध्ये दोन न्यायालयीन कक्षांसह एक अतिरिक्त मजल्याच्या बांधकामासाठी पाठपुरावा केला होता. त्यास मुख्यमंत्री यांच्याकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला याचे समाधान आहे. कर्जतचे पक्षकार आणि बार असोसिएशनमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

## राष्ट्रीय मंचावर वाघोली ग्रामपंचायतीच्या लोकसहभागी विकासकार्याची दखल

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**ढोरजळगांव:** राष्ट्रीय पातळीवर वाघोली ग्रामपंचायतीच्या लोकसहभागी विकासकार्याची दखल घेण्यात आल्याने संपूर्ण गावासाठी हा क्षण अत्यंत अभिमानास्पद ठरला आहे. कर्तव्य पथ, नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात येणाऱ्या प्रजासत्ताक दिन समारंभासाठी वाघोली ग्रामपंचायतीस सन्मानपूर्वक आमंत्रण प्राप्त झाले असून, हे आमंत्रण ग्रामविकासाच्या दिशेने करण्यात आलेल्या सातत्यपूर्ण, नियोजनबद्ध आणि लोकाभिमुख प्रयत्नांची अधिकृत पावती आहे.

लोकसहभाग, श्रमदान तसेच विविध विकासात्मक उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी यामुळे वाघोली गावाने राष्ट्रीय स्तरावर आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. स्वच्छता, पायाभूत सुविधा, सामाजिक सहभाग आणि शाश्वत विकास यांसारख्या क्षेत्रांत ग्रामस्थांनी एकत्र येत राबवलेल्या उपक्रमांची दखल केंद्र पातळीवर घेतली जाणे ही निश्चितच उल्लेखनीय बाब आहे.

## महिलेच्या घरावर अनाधिकृत ताबा ; १० जणांविरुद्ध गुन्हा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर**–सावेडी उपनगरातील बिशप लॉईड कॉलनी परिसरात एका बंद घराचा कडीकोयंडा तोडून अनाधिकृतपणे ताबा मिळवण्याचा प्रयत्न केल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी अनिता खिस्ती यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात प्रमोद पगारे, सनी पगारे, कपिल पगारे आणि इतर सात ते आठ अनोळखी व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी अनिता खिस्ती या मूळच्या पुणे येथील रहिवासी असून, सावेडीतील मॅक केअर हॉस्पिटलसमोर त्यांचा प्लॉट नंबर ३८० मध्ये बंगला आहे. काही दिवसांपूर्वी त्यांनी हे घर विक्रीसाठी काढले होते. त्यावेळी प्रमोद पगारे याने घर खरेदीसाठी बोलणी केली होती. मात्र किमंतीवरून व्यवहार न ठरल्याने फिर्यादीने घर विकण्यास नकार दिला होता.

# चांभूर्डीत सरकारी जमिनीवर मुरूम उपसा

## शासकीय क्षेत्रावर घाव, प्रशासन सुस्त!

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** तालुक्यातील सरकारी जमीन म्हणजे कोणाची खासगी मालमत्ता नव्हे, पण चांभूर्डीत मात्र चित्र उलटं दिसतंय. गावाच्या हद्दीतील तब्बल १५ ते १८ एकर शासकीय जमिनीवर बिनधास्तपणे मुरूम उपसा सुरू असल्याचे स्पष्ट चित्र समोर येत आहे. विशेष म्हणजे हा सगळा प्रकार प्रशासनाच्या नाकावर टिच्चून सुरू असल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

शासकीय जमिनीवरील मुरूम उपसा हा गंभीर गुन्हा असताना, येथे मात्र जेसीबी, डंपर आणि वाहतूक दिवसा-ढवळ्या सुरू असल्याची चर्चा आहे. महसूल विभाग, तलाठी, मंडळ अधिकारी, खनिकर्म विभाग सगळेच जण जणू बघ्याची भूमिका घेत आहेत सरकारी काम अन बारा महिने थांब प्रमाणे कामकाज सुरू असल्याचा आरोप ग्रामस्थ करत आहेत.

कायदा पुस्तकात आहे, पण मैदानात नाही अशीच हीच वस्तुस्थिती पाहण्यास मिळतातत या बेकायदेशीर उत्खननामुळे शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत असून पर्यावरणाचाही मोठा ऱ्हास होत आहे. शासकीय जमीन सपाट होत चालली आहे, भविष्यातील सार्वजनिक उपयोग धोक्यात येत आहे. आज मुरूम गेला, उद्या जमीनच गायब अशी स्थिती निर्माण होण्याची भीती व्यक्त होत आहे. प्रशासनाने तात्काळ स्थळ पाहणी करून दोषींवर कठोर कारवाई, मुरूम उपसा थांबवणे, जप्ती व दंडात्मक कारवाई करणे अपेक्षित आहे. अन्यथा शासकीय जमिनीवरील हा मुरूम उपसा उद्या मोठ्या घोटाळ्याचं रूप घेईल, हे वेगळं सांगायला नको.







**ग्रामस्थांना पडलेला प्रश्न**

सरकारी जागेवरून उत्खननात मोठ्या प्रमाणात मुरूम उपसा होत आहे त्यामुळे येथील ग्रामस्थांचा थेट सवाल आहे की यासाठी परवानगी कोणाची? संरक्षण कोणाचं? आणि फायदा कोणाचा? मात्र याचे उत्तर मात्र कुणाकडेच नाही.

**कायदा झोपला तर माफिया जागा असतो**

रोज सायंकाळी महसूल कायदा झोपतो मात्र तस्कर जागेच असतात त्यामुळे प्रशासनाने यावर तात्काळ कारवाईचे पाऊल उचलले गरजेचे आहे नाहीतर कायदा झोपतो आणि माफिया जागाच राहतो असे म्हनने काही वावगे ठरणार नाही

# मुलगी आणि आई चांगल्या मैत्रीणी बना : गितांजली शेळके

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**निघोज :** ग्रामीण भागात महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना युवतींनी आपल्या आईवडिलांचा विश्वास सार्थकी लावत असताना नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करा. महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना मुलगी आणि आई चांगल्या मैत्रीणी बना. आणि सोशल मीडियाचा वापर स्वत:च्या शिक्षणासाठी करा असा सल्ला जीएस महानगर बॅकेच्या अध्यक्षा गीतांजली शेळके यांनी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनींना दिला.




निघोज येथील मुलिकादेवी महाविद्यालयात आई माझ्या महाविद्यालयात हा नाविन्यपूर्ण उपक्रम साजरा करण्यात आला. यावेळी मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एस, के, आहेर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी महाविद्यालयाच्या उपप्राचार्य मनिषा गाडीलकर, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे सचिव शांताराम कळसकर, जेष्ठ पत्रकार दत्ता उनवणे, जिल्हा बॅकेचे तालुका विकास अधिकारी प्रभाकर लाळगे, मुंबई बॅकेचे वरिष्ठ अधिकारी सुभाष खणकर,श्रीकांत खोडदे आदींसह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी शेळके म्हणाल्या की, ग्रामीण भागात पुर्वी महाविद्यालयीन शिक्षणाची सोय कमी असल्याने मुलींचे लवकर लग्न करून दिली जात होती. त्यामुळे शिक्षणाची आवड असतानाही अनेक मुलींना लग्नामुळे शिक्षण घेता आले नाही. त्यामुळे साक्षरता कमी झाली. मात्र आता ग्रामीण भागात दर्जेदार शिक्षण मिळत असल्याने मुलींनी आधी शिक्षण घेवून स्वत:च्या पायावर उभे रहावे. आज शिक्षणाला खुप महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे प्रतिकुल परीस्थितीला सामोरे जाताना नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करून जीवनातील उच्च धेय गाठा. यावेळी प्राचार्य एस. के. आहेर यांनी महाविद्यालयात राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमाची माहिती दिली. प्रास्ताविक उपप्राचार्य मनिषा गाडीलकर यांनी केले, सुत्रसंचालन प्रा. निलिमा घुले यांनी केले तर प्रा. दुर्गा रायकर यांनी आभार मानले.

या कार्यक्रमात उपस्थित माता अन् विद्यार्थिनीने मनोगत व्यक्त करताना आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली. अतिशय भावनिक होत उपस्थित मातांनी आपल्या मुलींना पाठबळ दिले. महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना जीवनात उंच भरारी घ्या. आपल्या माता तुमच्या पाठीशी उभे राहतील . तसेच प्रत्येक मुलींनी आपल्या आईवडिलांची काठी व्हा

असा संदेश या कार्यक्रमातुन देण्यात आला

# मैदान मारलं!

## राष्ट्रीय खो-खो स्पर्धेत काकडे विद्यालयाचा झेंडा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**एरंडगाव :** राजस्थानच्या मातीत रंगलेल्या ६९ व्या राष्ट्रीय शालेय खो-खो स्पर्धेत महाराष्ट्राच्या वाघांनी आपला दरारा निर्माण केला आहे. शेवगाव येथील आबासाहेब काकडे विद्यालयाचे दोन हिरे विक्रम रमेश राठोड आणि सोहम अशोक काळे यांनी आपल्या विजांसारख्या चपळाईने राष्ट्रीय पातळीवर ''कांस्यपदक''पटकावून ऐतिहासिक कामगिरी केली आहे.



''खो-खो हा केवळ खेळ नसून ती जिद्द आहे, आणि ही जिद्द आबासाहेब काकडे विद्यालयाच्या खेळाडूंनी राजस्थानमध्ये सिद्ध करून दाखवली आहे!

**मैदानावर 'काकडे' पॅटर्नचा जलवा!**

राजस्थानमध्ये झालेल्या या अटीतटीच्या स्पर्धेत देशाभरातील नामांकित संघांनी सहभाग घेतला होता. मात्र, विक्रम आणि सोहम यांनी मैदानात दाखवलेली पकड, 'खो' देण्याची अचूक वेळ आणि चपळ संरक्षण यामुळे प्रतिस्पर्धी संघांना घाम फुटला. या यशाने आबासाहेब काकडे विद्यालयाचे नाव आता देशाच्या क्रीडा नकाशावर सुवर्ण अक्षरात कोरले गेले आहे.

**गुरूंचे मार्गदर्शन आणि जिद्द**

या यशामागे खेळाडूंची अहोरात्र मेहनत आणि विद्यालयाचे क्रीडा शिक्षक कल्पेश भागवत, संतोष ढोले, सचिन वाल्हेकर व विक्रम घुटे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. मैदानावरील डावपेच आणि शिस्तीच्या जोरावर या खेळाडूंनी हे शिखर गाठले आहे.

**आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहात जल्लोष**

या दैदिप्यमान विजयाची बातमी समजताच शैक्षणिक समूहात एकच जल्लोष करण्यात आला. समूहाचे प्रमुख डॉ. ॲड. विद्याधर काकडे, सहप्रमुख हर्षदाताई काकडे, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा. डॉ. लक्ष्मण बिटाळ, विश्वस्त पृथ्वीसिंग काकडे यांनी खेळाडूंचे कौतुक करताना म्हटले की, ''ग्रामीण भागातील खेळाडूंनी राष्ट्रीय स्तरावर मारलेली ही झेप अभिमानास्पद आहे.''

या यशाबद्दल शालेय शिक्षण विभाग प्रमुख वंदना पुजारी, अशोक आहेर, प्राचार्य संपत दसपुते, उपमुख्याध्यापिका पुष्पलता गरुड, पर्यवेक्षक सुनील आव्हाड, लक्ष्मण गाडे, रवींद्र आगळे, प्रभारी उपप्राचार्य अशोक तमनर तसेच सर्व शिक्षक आणि पालकांनी साई लवाट व विजेत्या खेळाडूंचे मनापासून अभिनंदन केले आहे.

## पारगावं सुद्रिकमध्ये नगराध्यक्षा-उपनगराध्यक्षा यांचा नागरी सत्कार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा** - तालुक्यातील पारगावं सुद्रिक येथे मकर संक्रांतीच्या पावन पर्वावर पारगावं सुद्रिक येथे हळदी-कुंकू कार्यक्रमासह नगराध्यक्षा व उपनगराध्यक्षा यांचा भव्य नागरी सत्कार मोठ्या उत्साहात पार पडला. यानिमित्ताने भव्य डीजे सह मिरवणूक काढण्यात आली असून, संपूर्ण गावात उत्सवाचे वातावरण निर्माण झाले होते.

या कार्यक्रमास डॉ. प्रतिभा पाचपुते यांची प्रमुख उपस्थिती लाभली. सामाजिक बांधिलकी जपत महिलांना वाण वाटप, तर जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना फळांचे वितरण करण्यात आले. पारगावं पंचक्रोशीतील महिला मोठ्या संख्येने उपस्थित राहिल्या होत्या. तसेच तालुक्यातील भाजपा पदाधिकारी व ग्रामस्थ यांनीही सत्कारासाठी उपस्थिती लावली.

कार्यक्रमादरम्यान उपगटनेत्या मीराताई शिंदे व उपनगराध्यक्षा अलका अनभुले यांनी महिलांना मार्गदर्शन केले. त्यांनी महिलांच्या सहभागातून विकासाची दिशा अधिक भक्कम होते, असा विश्वास व्यक्त केला.

या कार्यक्रमाचे आयोजन भाजपा तालुका अध्यक्षा संगीता घोडेकर व सरपंच मनीषा हिरवे यांनी केले होते. आपल्या भाषणात त्या म्हणाल्या, आ. विक्रम पाचपुते साहेबांच्या मार्गदर्शनाखाली नगरपालिका निवडणुकीत मोठे यश मिळाले आहे. येणाऱ्या पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुकांतही निश्चित यश मिळवू. महिलांनी आपल्या लाडक्या भावाच्या पाठीशी ठामपणे उभे राहून तालुक्याच्या विकासासाठी संधी द्यावी आणि तालुका भाजपमय करावा, अशी त्यांनी भावनिक साद घातली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रामपंचायत सदस्य मंगेश घोडके व सरपंच सौ. मनीषाताई हिरवे यांनी केले. उत्साह, एकजूट आणि विकासाचा निर्धार या तिन्हींचा संगम असलेला हा सोहळा पारगावं सुद्रिकच्या सामाजिक-राजकीय जीवनात लक्षवेधी ठरला.



# चिचोंडीत रंगला 'खेळ पैठणीचा'

## आठवणींच्या हिंदोळ्यावर कर्डिले-आटकर यांचा स्नेहबंध झाला घट्ट

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिराळ चिचोंडी :** चिचोंडी येथील परिसरात नुकताच 'हळदी-कुंकू' आणि 'खेळ पैठणीचा' कार्यक्रम अत्यंत उत्साहात पार पडला. या सोहळ्याने केवळ महिलांची मनेच जिंकली नाहीत, तर स्वर्गीय शिवाजीराव कर्डिले आणि चिचोंडी गाव यांच्यातील अतूट नात्याच्या आठवणींनी उपस्थितांचे डोळेही पाणावले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना सामाजिक कार्यकर्ते एकनाथ आटकर यांनी भावना व्यक्त केल्या. ते म्हणाले, ''स्वर्गीय शिवाजीराव कर्डिले साहेबांच्या दूरदृष्टीमुळे आणि त्यांनी उपलब्ध करून दिलेल्या कोट्यवधींच्या निधीमुळे चिचोंडी गावचा आज कायापालट झाला आहे. गाव खऱ्या अर्थाने सुजलाम सुफलाम झाले असून, हे ऋण आम्ही कधीही



विसरणार नाही.'' भाजपचे जिल्हाध्यक्ष अक्षय कर्डिले यांनी आपल्या भाषणात कर्डिले कुटुंबाचे चिचोंडीशी असलेले ऋणानुबंध स्पष्ट केले. ''कर्डिले साहेबांची चिचोंडी गावाशी जोडलेली नाळ मी आयुष्यभर तुटू देणार नाही,'' असे आश्वासन त्यांनी दिले. पुढे बोलताना ते म्हणाले, ''कर्डिले साहेब एकनाथ आटकर यांना आपला मानसपुत्र मानत असत. त्याच प्रेमाने आणि हक्काने मी सुद्धा आटकर यांच्या पाठीशी 'मानस भाऊ' म्हणून खंबीरपणे उभा राहीन.'' अक्षय कर्डिले यांच्या या विधानाने कर्डिले-आटकर कुटुंबातील रक्तापलीकडचे नाते पुन्हा एकदा हजारो महिलांच्या साक्षीने अधोरेखित झाले. यावेळी आयोजित 'खेळ पैठणीचा' या कार्यक्रमात महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. विजेत्या महिलांना पैठणी देऊन सन्मानित करण्यात आले, तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहत होता. प्रियांका कर्डिले यांनी देखील यावेळी चिचोंडीकरांवरील विशेष प्रेमाचा उल्लेख केला. त्या म्हणाल्या, ''चिचोंडीचे नाव निघाले की साहेबांच्या मुखातून आपसूकच एकनाथ आटकर यांचे नाव यायचे. आटकर कुटुंब आणि संपूर्ण गाव हे कर्डिले परिवाराचाच एक भाग आहे.'' असे प्रियंका कर्डिले यांनी सांगितले. 'पत्रकार दिनाचे' औचित्य साधून चिचोंडी, मिरी आणि करंजी भागातील पत्रकारांचा विशेष गौरव करण्यात आला. समाजाचा आरसा म्हणून काम करणाऱ्या पत्रकारांप्रती यावेळी कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. मिरी-करंजी गटातील हजारो महिलांच्या जनसमुदायामुळे हा सोहळा केवळ एक कार्यक्रम न राहता, तो एक कौटुंबिक स्नेहमेळावा ठरला.

**खेळ पैठणीच्या विजेत्या महिला:**

विजेत्या महिला अंबिका दानवे, रोहिणी गोरे, आकांक्षा दानवे, अलका कारखेले, ऋतुजा जऱ्हाड, शितल खाडे, ऐश्वर्या आव्हाड, प्रयागा आव्हाड,यांनी खेळ पैठणीची पैठणी जिंकल्या.

यावेळीची सरपंच श्रीकांत आटकर, आबा गरुड,संदीप दानवे,पिनू भिंगारदिवे, विनोद भिंगारदिवे, माजी सरपंच धनश्री गंडाळ,अंबिका दानवे,वैशाली गरुड, प्रयागाबाई आव्हाड, सोनाली फुळमाली,गुलाब फुळमाळी, व परिसरातील हजारो महिला भगिनी कार्यक्रमास उपस्थित होत्या. सामाजिक कार्यकर्ते एकनाथराव आटकर मित्रपरिवार कडून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

# वाळू तस्करांचा महसूल पथकावर पथकावर हल्ला

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**


**कोपरगाव :** कोपरगाव तालुक्यातील माहेगाव देशमुख परिसरात अवैध वाळू वाहतुकीवर कारवाई करण्यासाठी गेलेल्या महसूल विभागाच्या भरारी पथकावर हल्ला झाल्याची धक्कादायक घटना घडली. ही घटना २४ जानेवारी २०२६ रोजी पहाटे ३.३० वाजता घडली असून, याप्रकरणी संबंधितांविरोधात कोपरगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तहसीलदार कार्यालयाच्या वाहनावर चालक म्हणून कार्यरत असलेले रामदास माळवदे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, भरारी पथकाने वाळूने भरलेले एक हायवा आणि एक टिपर अडवले. वाहने तहसील कार्यालयात आणण्यास सांगितले असता, अर्जुन गुरळे आणि प्रतीक कोळपे यांच्यासह इतर अनोळखी व्यक्तींनी पथकास शिवीगाळ केली, धक्काबुक्की केली आणि वाहन पळवून नेले. यावेळी कोणालाही फोन करू नये असे सांगत माळवदे यांचा फोन अर्जुन गुरळे याने हिसकावून घेतला आणि दमदाटी केली. इतकेच नव्हे तर, शासकीय कामात अडथळा आणून बंदुकीची धमकी देत दहशत निर्माण करण्यात आली.



या घटनेनंतर माळवदे यांनी कोपरगाव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार, भारतीय न्याय संहिता (बीएनएस) २०२३ कलम १३२, १२१(१), ३०३(२), १८९(२), १९१(३), ३५१(२), ३५२ आणि ११९(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास कोपरगाव तालुका पोलीस निरीक्षक संदीप कोळी करीत आहेत. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, अवैध वाळू वाहतुकीविरोधात कारवाई करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न उपस्थित झाला आहे. महसूल विभागाने याप्रकरणी कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

द ख ल



## भास्करगिरी महाराजांची चव्हाण परिवाराला सांत्वनपर भेट

**नेवासा :** येथील दुर्गादेवी मंदिराच्या सेवेकरी व नेवासा प्रेस क्लबचे कार्याध्यक्ष पत्रकार सुधीर चव्हाण यांच्या मातोश्री वत्सलाबाई चव्हाण यांचे नुकतेच निधन झाले. देवगड संस्थानचे महंत राष्ट्र संत गुरुवर्य भास्करगिरी महाराज यांनी भेट देऊन चव्हाण परिवाराचे सांत्वन केले. या प्रसंगी बाळू महाराज कानडे,संदीप साबळे व चव्हाण व कदम परिवारातील सदस्य दिसत आहे.

## शाहू विद्यालयात हळदी-कुंकू व मातृ पूजन

**सोनई :** नेवासा तालुक्यातील माका येथील राजश्री शाहू महाराज माध्यमिक विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालयात हळदीकुंकू व मातृ पूजन कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. विद्यालयाचे प्राचार्य जे. आर. शेटे यांच्या संकल्पनेतून हा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने माता भगिनी उपस्थित होत्या. इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी माता-भगिनीचे फुले उधळून स्वागत केले. विद्यालयाच्या अध्यापिका हंडाळ यांनी हळदीकुंकू विषयी सविस्तर माहिती दिली. प्रत्येक सौभाग्यवतीने उखाण्यातून आपली विशेष असे ओळख करून दिली. मुला मुलींनी आपापल्या आईचे मातृ पूजन केले. याप्रसंगी संगीत खुर्चीचा कार्यक्रम घेण्यात आला. प्रत्येक महिलांना करवंडा हे वाण देऊन अल्पोउपहार देण्यात आला.सूत्रसंचालन एस.एस. वाघ तर आभार शिक्षक एम.ऐ. एडके, व एस.डी नन्नवरे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकांचा कर्मचारी यांनी प्रयत्न केले.

## डॉ. श्वेता गाढवे एम.एस.जनरल सर्जन परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण

**कोपरगांव :** येथील डॉ. श्वेता चंद्रकांत गाढवे यांनी जळगांव येथील डॉ. उल्हास पाटील मेडिकल कॉलेजमधून एम. एस. जनरल सर्जन (सामान्य शल्यचिकित्सक) परीक्षेत प्रथम श्रेणी प्राप्त केली आहे. कोपरगांव येथील गोदावरी खोरे नामदेवरावजी परजणे पाटील तालुका सहकारी दूध संघाचे कार्यकारी संचालक चंद्रकांत गाढवे यांच्या त्या कन्या आहेत.

डॉ. श्वेता गाढवे यांनी कोपरगांव येथील सेवानिकेतन स्कूलमधून दहावीपर्यंतचे शिक्षण घेतल्यानंतर महाविद्यालयीन शिक्षण सद्गुरु गंगागिरी महाराज महाविद्यालयातून पूर्ण केले. या दोन्हीही ठिकाणी त्यांनी प्रथम श्रेणीतील प्राविण्य मिळविलेले आहे. येथील महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी जळगांव केथील डॉ. उल्हास पाटील मेडिकल कॉलेजमध्ये एम. बी. बी. एस. व एम. एस. हे वैद्यकीय पदवी शिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले. नुकत्याच झालेल्या एम. एस. जनरल सर्जन परीक्षेत त्यांनी प्रथम क्रमांक मिळविला आहे.

## वंचितच्या तालुकाध्यक्षपदी गौतम चित्ते यांची निवड

**शिरसगाव :** वंचित बहुजन आघाडीने संघटन मजबूत करण्याच्या दृष्टीने एक महत्त्वाचा निर्णय घेतला असून, चळवळीशी सुरुवातीपासून एकनिष्ठ राहिलेले, आक्रमक व लोकाभिमुख नेतृत्व म्हणून ओळख असलेले गौतम चित्ते यांची श्रीरामपूर तालुका अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. या निवडीमुळे तालुक्यातील कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

गौतम चित्ते हे आंबेडकरी विचारधारेचे कट्टर समर्थक असून, सामाजिक न्याय, शोषित-वंचितांचे प्रश्न, घरकुल, पाणी, आरोग्य, रोजगार यांसारख्या ज्वलंत प्रश्नांवर त्यांनी सातत्याने लढा दिला आहे. कोणतेही पद नसताना देखील रस्त्यावर उतरून आंदोलन, निवेदने, मोर्चे यांच्या माध्यमातून त्यांनी प्रशासनाला धारेवर धरले आहे. त्यांच्या या संघर्षशील भूमिकेची दखल घेत पक्षाने त्यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे.

## ढगाळ हवामानामुळे पिकांवर रोगांचा प्रादुर्भाव

**ढोरजळगांव :** ढोरजळगांव (ता.शेवगाव) सह परिसरात गेल्या काही दिवसापासुन आकाशातील ढगांच्या चादरीमुळे रब्बीतील उभ्या असलेल्या पिकावर परिणाम पहायला मिळत आहे, निसर्गाच्या सततच्या संकटामुळे शेतकरी मात्र मेटाकुटीला आला आहे. शेवगाव तालुक्याच्या पश्चिम भागात कपाशीचे पिक जेमतेम पदरात पडल्यानंतर रब्बीच्या उत्पादनांतून संसाराचा गाडा चालवता येईल या आशेवर असतांनांच अवकाळी पाऊस व सततच्या ढगाळ हवामानामुळे ,कांदा, हरबरा, गहू या पिकांवर रोगांचा प्रादुर्भाव जाणवू लागला आहे. शेतकऱ्यांसमोर दिवसेंदिवस नवे संकट उभे रहात असल्याने शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले आहे.

गेल्या दोन ते तीन वर्षांपासून पावसाचे चक्र पुर्णपणे बदलले असून, प्रत्येक ऋतूत अवकाळी तसेच ढगाळ वातावरणामुळे पिकांवर किडींचा प्रादुर्भाव झाल्याने संक्रांत पहायला मिळत आहे. खरीप हंगामात कपाशीची लागवड ७ जूनला झाली परंतु ऐनवेळी पावसाने पाठ फिरवून नंतर सततच्या पावसामुळे कपाशी उत्पादनावर त्याचा परिणाम पहायला मिळाला. उरल्यासुरल्या कपाशी पिकातून घरखर्च भागुन उसनवारी देता येईल या आशेवर कपाशी पिकाकडे पाहिले जात असतांना कपाशीच्या क्विंटलला साडेसात हजार या हमी भावापेक्षा खाजगी व्यापाऱ्याकडून सुरुवातीला ६५०० ते ६८०० पर्यंत कपाशी खरेदी करण्यात आली.

# देर्डे चांदवड श्री मारुती देवस्थानास 'क' वर्ग दर्जा मंजूर : आ. काळे

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**कोळपेवाडी :** जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत केलेल्या मागणीनुसार देर्डे चांदवड येथील मारुती देवस्थानास 'क' वर्ग दर्जा मंजूर करण्यात आला असल्याची माहिती आ. आशुतोष काळे यांनी दिली असून कोपरगाव रुग्णालयासाठी अतिरिक्त रुग्णवाहिका मिळावी या प्रमुख मागण्यांसह जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पा.यांच्याकडे त्यांनी मतदार संघाच्या विविध मागण्या मांडल्या आहेत.

जिल्हा नियोजन समितीची बैठक रविवार (दि.२५) रोजी राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पा.यांच्या अध्यक्षतेखाली व विधान परिषदेचे सभापती ना.रामजी शिंदे यांच्या उपस्थितीत जिल्हधिकारी कार्यालयात जिल्हा नियोजन समितीची बैठक पार पडली. या बैठकीत आ. आशुतोष काळे यांनी कोपरगाव मतदार संघाच्या विविध अडचणी व समस्या मांडल्या. यामध्ये कोपरगाव मतदार संघातील देर्डे चांदवड येथील श्री मारुती देवस्थानास 'क' वर्ग दर्जा मिळावा हि मागणी मंजूर करण्यात आली आहे. कोपरगाव ग्रामीण रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करण्यात आले असून १०० बेडच्या उपजिल्हा रुग्णालयाचे काम प्रगतीपथावर आहे. या रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांच्या संख्येत वाढ झाली असून सर्व रुग्णांना वेळेत उपचार मिळावे यासाठी अतिरिक्त रुग्णवाहिका मिळावी. तसेच तसेच संवत्सर प्राथमिक आरोग्य केंद्राचे श्रेणीवर्धन होवून त्या ठिकाणी ३० बेडच्या ग्रामीण रुग्णालयास मंजुरी देण्यात येवून ते कामही प्रगतीपथावर असून संवत्सर प्रमाणे कोकमठाण गावची लोकसंख्या देखील १० ते ११ हजाराच्या आसपास असून त्या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्राची आवश्यकता आहे. त्यामुळे संवत्सर प्राथमिक आरोग्य केंद्राचे कोकमठाण येथे स्थलांतर करण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीकडे दाखल केलेला असून सदरचा प्रस्ताव तातडीने शासनास सादर करावा.

शासकीय जमिनीची शासकीय प्रयोजनासाठी मोजणी अधिकारी यांनी विनामूल्य मोजणी करून देणेकरीता तहसीलदार, कोपरगांव यांनी वेळोवेळी मागणी उपअधिक्षक, भूमी अभिलेख यांचेकडे केलेली असून त्यावर कुठल्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्याकरिता मा.जिल्हाधिकारी यांनी कोपरगाव मतदार संघातील शासकीय जमिनी शासकीय प्रयोजनासाठी विनामूल्य मोजणी करण्यासाठी संबंधितांना तातडीने आदेश द्यावेत. तसेच नांदेड जिल्हा परिषदेने ज्याप्रमाणे विज बिल मुक्त ग्रामपंचायत अभियान राबविले आहे त्याप्रमाणे सदरची योजना अहिल्यानगर जिल्हा परिषद अंतर्गत येणाऱ्या सर्व ग्रामपंचायतीमध्ये राबविण्यात यावी. ग्रामपंचायतीचा वीज बिलाचा भार कमी करण्यासाठी ग्रामपंचायत, शाळा व अंगणवाडी आदी संस्थांना सोलरद्वारे विजपुरवठा करावा.

या बैठकीसाठी जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे,आ.मोनिकाताई राजळे,आ. डॉ.किरण लहामटे, आ.विठ्ठल लंघे, आ.विक्रम पाचपुते, आ.अमोल खताळ, आ.काशिनाथ दाते, जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी व अधिकारी आदी उपस्थित होते.




### मंत्री, आमदार, खासदार कोणाचे नाव सांगितले तरी सोडू नका

कोपरगाव मतदार संघात सुरु असलेल्या अवैध व्यवसायाबरोबरच अवैधरीत्या सुरु असलेला बेसुमार वाळू उपसा व तसेच शेतकऱ्यांच्या व वन विभागाच्या जमिनीतून मातीच्या उपशाबाबत आक्रमक झालेल्या आ.आशुतोष काळे यांनी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीतही हा मुद्दा उपस्थित करून पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पा.यांचे लक्ष वेधले.त्यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी कारवाई करणार असल्याचे सांगितले असता पालकमंत्र्यांनी त्यांना सक्त आदेश दिले आहेत. अवैध व्यवसाय करणारा मंत्री, आमदार, खासदार कोणाचे नाव सांगितले तरी सोडू नका, कडक कारवाई करा अशा सूचना पोलीस प्रशासनाला पालकमंत्र्यांनी दिल्या.

## नेवासा तहसील कार्यालयात 'राष्ट्रीय मतदार दिन' साजरा



प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** आजचे विद्यार्थी हे उद्याचे राष्ट्रनिर्माते आहेत, त्यामुळे त्यांनी आतापासूनच मतदानाचे मूल्य समजून घेणे काळाची गरज आहे. भारतीय लोकशाहीची खरी ताकद मतदारांमध्ये आहे. जेव्हा प्रत्येक नागरिक आपला मतदानाचा पवित्र हक्क बजावेल,तेव्हाच लोकशाही अधिक सक्षम,पारदर्शक आणि उत्तरदायी बनेल असे प्रतिपादन प्रांताधिकारी सुधीर पाटील यांनी केले.

भारतीय लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी आणि नवमतदारांमध्ये मतदानाबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने रविवार दि. २५ रोजी नेवासा तहसील कार्यालयाच्या वतीने 'राष्ट्रीय मतदार दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. त्याप्रसंगी उपस्थित नवमतदार विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना उपविभागीय पाटील बोलत होते.

यावेळी तहसीलदार डॉ. संजय बिरादार, निवडणूक शाखेचे नायब तहसीलदार प्रशांत गोसावी,उपशिक्षण अधिकारी समी शेख, महाविद्यालयीन प्रतिनिधी प्रा. सुनील गर्जे,बदामबाई विद्यालयाचे मुख्याध्यापक विश्वनाथ नानेकर व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना तहसीलदार डॉ. संजय बिरादार यांनी राष्ट्रीय मतदार दिनाचे ऐतिहासिक महत्त्व स्पष्ट करत गेल्या काही वर्षात मतदानाची कमी होणारी टक्केवारी ही लोकशाहीसाठी घातक व शोकांतिका असून मतदारांमध्ये जागरूकता निर्माण करणे तसेच मतदारांनी लोकशाहीचा हा उत्सव प्रत्यक्षात मतदान केंद्रावर साजरा करावा असे आवाहन केले.

यावेळी निवडणूक विभागाचे असिफ शेख, विकास दारूटे, चंद्रकांत कहार, शिवशंकर श्रीनाथ तसेच प्रा. मुकुंद खर्डे, युसूफ शेख, अशोक डौले, प्रकाश पटेकर, श्रीहरी तांबडे, प्रशांत खंडाळे, निहाल, अजय आव्हाड या विविध शाळांच्या शिक्षकांबरोबर विद्यार्थी, शिक्षक, अधिकारी व नागरिक उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपशिक्षण अधिकारी समी शेख यांनी केले.



## मकर संक्रांतीनिमित्त पंचगंगा शुगरतर्फे ऊसतोडणी कामगारांना साखर वाटप

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** मकर संक्रांतीच्या पावन पर्वानिमित्त पंचगंगा शुगर अँड पॉवर प्रायव्हेट लिमिटेड, महालगाव यांच्या वतीने राहुरी तालुक्यातील पिंप्री अवघड येथे ऊस तोडणी कामगारांना साखर वाटपाचा उपक्रम राबविण्यात आला. या सामाजिक उपक्रमामुळे ऊस तोडणी कामगारांमध्ये आनंद व समाधानाचे वातावरण निर्माण झाले.

पंचगंगा शुगर अँड पॉवर हा साखर कारखाना चेअरमन प्रभाकरजी शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असून, शेतकऱ्यांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देत पारदर्शक वजनकाटा, वेळेवर ऊस बिलांचे भुगतान तसेच शेतकरी हिताचे निर्णय यामुळे अल्पावधीतच हा कारखाना शेतकऱ्यांच्या विशेष पसंतीस उतरला आहे. शेतकरी व कामगार यांच्याशी आपुलकीचे नाते जपण्यावर कारखान्याचे व्यवस्थापन सातत्याने भर देत आहे. मकर संक्रांतीनिमित्त ऊस तोडणी कामगारांच्या सन्मानार्थ साखर वाटपाचा उपक्रम राबवून पंचगंगा शुगर अँड पॉवरने आपली सामाजिक बांधिलकी जपली असल्याचे यावेळी उपस्थित मान्यवरांनी सांगितले.

या कार्यक्रमास पंचगंगा शुगर अँड. पॉवरचे अभियंता नितेश लांबे, ग्री ओव्हरसीस सुनील माने, अमोल तारडे, प्रगतशील शेतकरी रामकिसन लांबे, बाबासाहेब बाचकर, गणेश लांबे आदी मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी पंचगंगा शुगर अँड पॉवरच्या कार्यपद्धतीचे कौतुक करत अशा सामाजिक उपक्रमांचा आवाक अधिक वाढवावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.



## बौद्धिक संपदा हक्कांशिवाय संशोधन असुरक्षित : डॉ. रावसाहेब हेगडे

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**लोणी :** संशोधन आणि पारंपरिक ज्ञानाचे कायदेशीर रक्षण करण्यासाठी बौद्धिक संपदा हक्क व पेटंट संरक्षण ही आजच्या काळाची अत्यावश्यक गरज आहे. पेटंटशिवाय केलेले संशोधन सुरक्षित राहत नाही आणि त्याचा गैरवापर होण्याची शक्यता अधिक असते, बौद्धिक संपदा शिवाय संशोधन असुरक्षित आहे. असे प्रतिपादन डॉ. रावसाहेब हेगडे यांनी केले.

लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी आणि पायरेन्स आय.बी.एम.ए यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित बौद्धिक संपदा हक्क जैवसंरक्षण आणि जैवविविधतेचे संवर्धन या विषयावरील चर्चासत्रात ते बोलत होते.

डॉ. रावसाहेब हेगडे यांनी. सांगितले की, भारतासारख्या जैवविविधतेने समृद्ध देशात जैवसंपत्तीवर आधारित संशोधन मोठ्या प्रमाणावर होत आहे. मात्र या संशोधनाला योग्य वेळी पेटंट संरक्षण मिळाले नाही, तर देशाचे बौद्धिक व आर्थिक नुकसान होऊ शकते. त्यामुळे शैक्षणिक संस्था, संशोधक आणि विद्यार्थ्यांनी बौद्धिक संपदा हक्क बाबत जागरूक होणे गरजेचे आहे. कार्यक्रमात प्रमुख बौद्धिक संपदा हक्क ची संकल्पना स्पष्ट करताना पेटंटचे महत्त्व अधोरेखित केले.

संस्थेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शिवानंद हिरेमठ म्हणाले, संशोधनातील आकडेवारी, संदर्भ, संकल्पना यांचे योग्य प्रकारे उद्धरण देणे, तसेच साहित्यचौर्य शोध प्रणाली सारख्या साधनांचा वापर करून संशोधन शुद्ध ठेवणे गरजेचे असून साहित्यचौर्य टाळून केलेले संशोधनच समाज, उद्योग आणि पर्यावरणाच्या हिताचे ठरते, विद्यार्थ्यांना नैतिक संशोधन संस्कृती जोपासण्याचे आवाहन केले . पायरेन्सआय बी एम एचे संचालक डॉ. मोहसिन तांबोळी यांनी आपल्या मार्गदर्शनात संशोधन क्षेत्रात साहित्यचौर्य टाळण्याचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी सांगितले की, कोणतेही संशोधन हे मौलिक, सत्याधिष्ठित आणि नैतिकतेच्या चौकटीत असणे आवश्यक आहे.

साहित्यचौर्य मुळे संशोधनाची विश्वासार्हता कमी होतेच, शिवाय संशोधक, संस्था आणि देशाची प्रतिमा धोक्यात येते.आजच्या स्पर्धात्मक युगात पेटंट, बौद्धिक संपदा हक्क आणि जैवसंशोधन यांचा थेट संबंध असल्याने साहित्यचौर्य प्लॅजिअरिझम मुक्त संशोधनाशिवाय पेटंट संरक्षण मिळणे अशक्य आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. संशोधनातील आकडेवारी, संदर्भ, संकल्पना यांचे योग्य प्रकारे उद्धरण देणे, तसेच साहित्यचौर्य शोध प्रणाली सारख्या साधनांचा वापर करून संशोधन शुद्ध ठेवणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

## लोणी येथे एसपीपीयू स्टार्टअप बूटकॅम्प २०२६ चे आयोजन

**लोणी :** लोकनेते पद्मभूषण डॉक्टर बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील प्रवरा ग्रामीण अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सेंटर ऑफ इनोव्हेशन, इन्क्युबेशन अँड एंटरप्राइज आणि वाधवानी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने एसपीपीयू स्टार्ट-अप बूटकॅम्प २०२६ या दोन दिवसीय स्टार्ट-अप बूटकॅम्पचे आयोजन मंगळवार दि. २७ आणि बुधवार २८ जानेवारी २०२६ रोजी करण्यात आल्याची माहीती प्राचार्य डॉ.संजय गुल्हाने यांनी दिली.

जलसंपदा मंत्री तथा संस्थेचे अध्यक्ष ना. राधाकृष्ण विखे पाटील आणि संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत असून, ग्रामीण भागातील युवकांमध्ये नवउद्योजकता व स्टार्ट-अप संस्कृती विकसित करणे हा यामागील प्रमुख उद्देश आहे. हा बूटकॅम्प अहिल्यानगर जिल्हा क्लस्टर अंतर्गत आयोजित करण्यात आला असून, स्टार्ट-अप आयडिया डेव्हलपमेंट, व्यवसाय मॉडेल तयार करणे, निधी उभारणी, इनोव्हेशन, बौद्धिक संपदा हक्क तसेच उद्योग व स्टार्ट-अप क्षेत्रातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन सत्रे आयोजित करण्यात आल्याची माहिती प्रिझमचे कार्यकारी अधिकारी डॉ.संजय कुरकुटे यांनी आणि समन्वयक प्रा.रविंद्र पारखे यांनी दिली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांतील विद्यार्थी, संशोधक, स्टार्ट-अप इच्छुक युवक व नवउद्योजकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## हळदी-कुंकू समारंभातून आरोग्य जागृती व्हावी : डॉ. जयश्री थोरात



प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर :** संपूर्ण कुटुंबाची काळजी घेणाऱ्या महिला नेहमी स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात.चांगला आहार, विश्रांती हे अत्यंत गरजेचे असून विविध ठिकाणी होणाऱ्या हळदीकुंकू समारंभातून महिला मोठ्या संख्येने एकत्र येतात अशा समारंभातून महिलांच्या आरोग्याबाबत जाणीव जागृती व्हावी असे प्रतिपादन एकविराच्या अध्यक्षा कॅन्सरतज्ज्ञ डॉ.जयश्रीताई थोरात यांनी केले आहे.

मालपाणी नगर येथील गणेश मंदिरात आयोजित हळदी कुंकू समारंभात त्या बोलत होत्या. यावेळी नगरसेविका रचना मालपाणी, मार्केट कमिटीच्या संचालिका दिपाली वर्पे यांच्यासह विविध महिला पदाधिकारी यांच्यासह परिसरातील सुमारे ५०० महिला भगिनी उपस्थित होत्या. यावेळी सर्व महिला भगिनींना स्थानिक महिला मंडळाच्या वतीने विविध वाण देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी बोलताना डॉ.जयश्रीताई थोरात म्हणाल्या की, हळदी कुंकवाच्या निमित्ताने विविध गावांमधून आणि शहरांमध्ये महिला भगिनी मोठ्या संख्येने एकत्र येतात एकमेकींच्या सुख दुःखा विषयी बोलतात. ही चांगली परंपरा आहे. त्या निमित्ताने विचारांची देवाण - घेवाण होते. या निमित्ताने सर्व महिला भगिनींनी आरोग्य विषयी चर्चा करणे अत्यंत गरजेचे आहे. कारण घरातील प्रत्येकाच्या आरोग्याची काळजी घेणारी महिला स्वतःच्या आरोग्याची काळजी घेत नाही हे सत्य आहे. वेळेचं व्यवस्थापन त्यांच्याकडून होत नाही आणि त्यामुळे कामच्या धावपळीमध्ये त्या स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. कालांतराने आजार बळवतात आणि मग कुटुंबाला अडचण तयार होते म्हणून महिलांनी स्वतःच्या आरोग्याची काळजी घ्याचबरोबर अशा समारंभांमधून एकल महिलांना सुद्धा सहभागी करून घ्या असे आवाहन त्यांनी केले. तर रचना मालपाणी म्हणाल्या की, मकर संक्रांतीच्या निमित्ताने महिला भगिनींचा हळदीकुंकू हा अत्यंत आवडीचा समारंभ असतो. त्या निमित्ताने वेळ काढून आपण एकमेकींच्या घरी जातो. आपलेपणाने चौकशी करतो. किंबहुना यामुळे दोन परिवारांमध्ये नाते अधिक वृद्धिंगत होते. अशा उपक्रमांमधून समाजातील विविध समस्यांवर चर्चा होऊन चांगले उपक्रम राबवण्यासाठी महिलांना सहभागी करून घेणे गरजेचे असल्याचे त्या म्हणाल्या. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिपाली वर्पे यांनी केले. सूत्रसंचालन मनीषा गव्हाणे यांनी केले तर वृषाली खैरनार यांनी आभार मानले. यावेळी महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. उखाणे, गाण्यांच्या भेंड्या, संगीत खुर्ची यामध्ये महिला भगिनी रमून गेल्या.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

सोमवार, दि.२६ जानेवारी २०२६ । अहिल्यानगर । पान नं. ६

## तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या



**सोनई :** नेवासा तालुक्यातील बेल्हेकरवाडी परिसरात एका ३२ वर्षीय तरुणाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली. अमोल आण्णासाहेब पवार (वय ३२, रा. बेल्हेकरवाडी, सोनई, ता. नेवासा) असे मयत तरुणाचे नाव आहे.याबाबत बाबासाहेब शंकर बेल्हेकर (वय ४९, व्यवसाय शेती, रा. बेल्हेकरवाडी) यांनी सोनई पोलीस ठाण्यात खबर दिली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दि. २४ जानेवारी २०२६ रोजी दुपारी २.४५ वाजण्याच्या सुमारास अमोल पवार याने आपल्या राहत्या घरात मफलरच्या साहाय्याने घराच्या छताला असलेल्या पंख्याला गळफास घेतला.घटनेची माहिती मिळताच नातेवाईकांनी व परिसरातील नागरिकांनी धाव घेतली; मात्र तोपर्यंत त्याचा मृत्यू झाला होता.घटनेनंतर सोनई पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. सदर घटनेचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक लबडे हे करीत आहेत. आत्म हत्येचे नेमके कारण अद्याप समजू शकले नसून पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# घरकुलांमध्ये शेकडो लाभार्थ्यांची फसवणूक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**बेलापूर :** ले-आउट नाही कोणते घरकुल मिळणार. केंद्र आणि राज्य शासनाचे अनुदान मंजूर असताना खाजगी कंत्राट दाराला पुढे करून सक्तीने घेतले जात असलेले लाखो रुपये यावरून बेलापूर ग्राम पंचायतीकडून घरकुल लाभार्थ्यांची फसवणूक होत आहे..

सर्वां समोर चिठ्ठ्या टाकून घरकुल वाटप व्हावे, अशी जोरदार मागणी करत बेलापूर ग्राम पंचायतीचे जेष्ठ सदस्य माजी सरपंच महेंद्र साळवी विद्यमान सदस्य रमेश अमोलिक भरत साळुंके यांनी गावकरी मंडळास घरचा आहेर दिला आहे.

ऐनतपूर बेलापूर येथे गोल्डन वॉटर कृषी पाम वर निवडक पत्रकारांशी त्यांनी संवाद साधला.

बेलापूर ग्रामपंचायतीत गावकरी मंडळाने चालविलेल्या हुकूमशाही पद्धतीच्या कारभाराचे त्यांनी पोलखोल केले.

श्रीरामपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुधीर नवले बेलापूर ग्रामपंचायतीचे माजी सरपंच व ज्येष्ठ सदस्य रवींद्र खटोड, पंचायत समितीचे माजी उपसभापती दत्ता कुऱ्हे, ऐनतपूर सोसायटीचे चेअरमन चंद्रकांत पाटील नाईक, बेलापूर सोसायटीचे माजी चेअरमन राजेंद्र सातभाई, पंडितराव बोंबले, सुधाकर खंडागळे, हरिहर फाउंडेशनचे अध्यक्ष विक्रम नाईक, शिवाजीराव पाटील वाबळे, ज्ञानदेव नाना वाबळे, आयाज शेख आदि नागरिकही यावेळी उपस्थित होते.

बेलापूर ग्रामपंचायतीचे ज्येष्ठ सदस्य रमेश अम ोलिक म्हणाले की, नेहमीप्रमाणे ग्रामपंचायत आम्ही बैठकीस जातो. तेथे उपस्थित असल्याबाबत सह्या घेतल्या जातात. मात्र काही हुशार सदस्यांकडून त्याचा अन्वयार्थ लावला जातो. आमच्या सह्या आहेत असे दाखवून बनवाबनवी करतात.

लेआउट मंजूर नाही तसेच कोणती घरे कोणाला मिळणार आहे या संदर्भातही माहिती दिली जात नाही. घरकुल लाभार्थ्यांना दमदाटी करून १ लाख ३५ हजार रुपये एकेकाकडून घेतले जात आहेत. ही रक्कम कोट्यावधी रुपयांच्या घरात आहे. ही बाब अतिशय गंभीर आहे. घेतलेल्या रकमेच्या पावत्याही दिल्या जात नाहीत. हरेगाव येथील कोणा एका ठेकेदार व्यक्तीला ग्रामपंचायतीत आणून तेथे हे पैसे गोळा केले जात आहेत. केंद्र आणि राज्य शासनाकडून घरकुल अनुदान मिळणार असतानाही हे पैसे कशासाठी गोळा केले जात आहेत याचा खुलासा ग्रामपंचायतीने करावा, अशी मागणी अमोलिक यांनी केली.

ले-आउट मंजूर नसताना घरकुले बांधली जात आहेत. या संदर्भात शासनाच्या कडक सूचना आहेत. शासनाच्या अटी आणि शर्तींचा भंग केल्यास ही जमीन शासनाकडे परत जमा होईल. असे शासकीय अधिकाऱ्यांनी सांगितले असताना ग्रामपंचायत घरकुले बांधण्याचा अट्टाहास करत आहेत. यात गरीब घरकुल लाभार्थ्यांचे मोठे नुकसान होणार आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी मोठ्या मनाने बेलापूरला ही जमीन दिली. त्यांचे मानावे तितके आभार कमीच आहेत मात्र ग्राम पंचायत घरकुल लाभार्थ्यांची फसवणूक करीत आहे, ती होऊ नये यासाठी ही पत्रकार परिषद आयोजित केली असल्याचा खुलासा ग्रामपंचायतीचे जेष्ठ सदस्य माजी सरपंच भरत साळुंके यांनी यावेळी केला. बेलापूर ग्रामपंचायतीचे माजी सरपंच व विद्यमान जेष्ठ सदस्य महेंद्र साळवी म्हणाले की, घरकुल लाभार्थ्यांना न्याय मिळावा यासाठी आपण गेल्या अनेक महिन्यांपासून भांडत आहोत. घरकुल लाभार्थ्यांकडून बळजबरीने लाखो रुपये जमा करण्यात येत असून या संदर्भात न्याय न मिळाल्यास आपण न्यायालयाचे दरवाजे ठोठावू. वेळप्रसंगी त्यांच्यावर गुन्हेही दाखल करू असा इशाराही त्यांनी दिला. घरकुलचे श्रेय घेण्यासाठी ग्रामपंचायत चुकीचे काम करत असून यामुळे चांगली योजना बदनाम होत आहे. घरकुलला आमचा कोणताही विरोध नाहीच. केवळ कोणती घरे कोणाला मिळणार आणि लाभार्थ्यांकडून सक्तीने पैसे कोण घेत आहेत त्याचा खुलासा व्हावा, अशी मागणी यावेळी सभापती सुधीर नवले यांनी केली.

### घरचा आहेर

महेंद्र साळवी आणि रमेश अमोलिक हे बेलापूर ग्राम पंचायतीत सत्तेत असलेल्या गावकरी मंडळाचे सदस्य आहेत. घरकुला संदर्भात त्यांनी मांडलेल्या भूमिकेबाबत गावकरी मंडळास हा घरचा आहेर मानला जात आहे. घरकुला संदर्भात जिल्हाधिकाऱ्यापर्यंत हे प्रकरण गेल्याने भविष्यात याबाबत गुन्हे दाखल होण्याची शक्यता आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे हे येत्या एक-दोन दिवसात बेलापूरला येण्याची चर्चा असून ग्रामपंचायतीत उद्योग करणाऱ्या पदाधिकाऱ्यांची विखे कशी कान उघडनी करतात याकडे गावाचे लक्ष लागले आहे.

### वाळू विकली

घरकुला शासनाकडून वाळू मोफत आहे. ग्रामपंचायतीने चलाखी करून लाभार्थ्यांच्या मोबाईलचे ओटीपी जमा करत त्यांना मिळणारी वाळू ही विकली असल्याचे यावेळी पत्रकार परिषदेत सांगण्यात आले. यामुळे ग्रामपंचायतीची पूर्ण नाचक्की झाली आहे. गावात याबाबत मोठी आणि खमंग चर्चा रंगली आहे.

## संजीवनी सैनिकी स्कूलचा दिल्लीत घुमला डंका

# राष्ट्रीय शालेय बँड स्पर्धेत देशात अव्वल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री




**कोपरगाव :** नवी दिल्ली येथे पार पडलेल्या राष्ट्रीय शालेय बँड स्पर्धेत संजीवनी रुरल एज्युकेशन सोसायटी संचलित संजीवनी सैनिकी स्कूल व ज्युनिअर कॉलेज, कोपरगाव यांनी ब्रास बँड बॉईज गटात देशात प्रथम क्रमांक पटकावून ऐतिहासिक यश संपादन केले आहे. या दैदीप्यमान काम गिरीबद्दल संजीवनी उद्योग समूहाच्या वतीने युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांनी विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे आणि संस्थेचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे. उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे, मा.आ. स्नेहलताताई कोल्हे यांनीही अभिनंदन केले आहे.

७७ व्या प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर संरक्षण मंत्रालय व शिक्षण मंत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या राष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठित स्पर्धेत देशातील चारही झोनमधील सर्वोत्तम संघ सहभागी झाले होते. अत्यंत अटीतटीच्या आणि उच्च दर्जाच्या या स्पर्धेत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध संचलन, तालबद्ध वादन आणि आत्म विश्वासपूर्ण सादरीकरणाच्या जोरावर अव्वल स्थान पटकावले, ही बाब संपूर्ण महाराष्ट्रासाठी अभिम ानास्पद असल्याचे विवेक कोल्हे यांनी नमूद केले.

ते पुढे म्हणाले की, हे यश केवळ एक पारितोषिक नसून शिस्त, परिश्रम, सातत्य आणि देशभक्तीच्या मूल्यांची राष्ट्रीय पातळीवर झालेली दखल आहे. योग्य संधी आणि मार्गदर्शन मिळाल्यास ग्रामीण भागातील विद्यार्थी कोणत्याही स्तरावर आपली गुणवत्ता सिद्ध करू शकतात, हे या यशातून पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. मी स्वतः अनेकदा या बँड पथकाचे सादरीकरण अनुभवले असून त्यांच्या कौशल्याने अंगावर रोमांच उभे राहतात.

या यशामागे संस्थेचे अध्यक्ष नितीन कोल्हे, कार्यकारी संचालक अमित कोल्हे, विश्वस्त सुमित कोल्हे, प्राचार्य कैलास दरेकर, बँड प्रशिक्षक, संगीत शिक्षक, सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी आणि पालकांचे मोलाचे योगदान असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

# गुन्हेगारीत घट, पोलीस अधीक्षकांनी केले समाधान व्यक्त!




प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** नुकतेच राहुरी पोलीस स्टेशन ची वार्षिक तपासणी पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे आणि श्रीरामपूर विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर यांनी घेऊन त्यामध्ये सन २०२३/२४/२५ या तीन वर्षातील दाखल झालेले गुन्हे व त्यातील उघडकीस आलेले गुन्हे याचा आढावा घेण्यात आला.

यामध्ये वाहन चोरीच्या घटनाम ध्ये लक्षणीय घट झाली असल्याची आढळून आले. सुमारे तीन वर्षात वाहनांची चोरींच्या घटनांच्या गुन्ह्यांची संख्या अगदी निम्म्यावर आली आहे.

सुमारे दोन वर्षांपूर्वी पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांनी राहुरी पोलीस स्टेशन चा पदभार स्वीकारला त्यावेळी जानेवारी २०२४ मधील प्रलंबित गुन्ह्याची ८५० असलेली संख्या (८५%) जानेवारी २०२६ पर्यंत विशेष प्रयत्न करून दोन वर्षात २००० गुन्हे दाखल होऊनही एकूण २६०० गुन्ह्याची निर्गती करून एकूण प्रलंबित गुन्हे १६५ (१६%) वर आणले या बाबत विशेष कौतुक केले.

यावेळी एका महिन्यात गुन्ह्याची निर्गती करणाऱ्या अंमलदाराचे पोलीस अधीक्षक यांनी कौतुक करून यांना प्रत्येकी २०० /- ते १०००/ रुपये प्रम ाणे ३० अंमलदारांना पोलीस अधीक्षक यांच्याकडून बक्षीस देण्यात आले आहे.

समन्स वॉरंट बजावणीत सुधारणा वॉरंट बजावणीचे प्रमाण फक्त २२% होते ते शंभर टक्के वर नेल्याने न्यायालयाने कामकाजात सुधारणा झाली आहे वॉरंटमधील आरोपी स्वतःहून न्यायालयात हजर राहत असल्याने न्यायालयाने समाधान व्यक्त केले आहे.

# गेवराई महावितरणमध्ये २.७२ कोटींचा 'दुरुस्ती' घोटाळा !

## कामाचा पत्ता नाही, मात्र कंत्राटदारांची बिले जोरात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बीड :** गेवराई तालुक्यातील वीज ग्राहक दररोज अंधाराचा साम ना करत असताना, महावितरणने मात्र कागदोपत्री दुरुस्तीचा मोठा 'खेळ' मांडल्याचे उघड झाले आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षात 'ब्रेकडाउन' दुरुस्तीच्या नावाखाली महावितरणने चक्क २ कोटी ७२ लाख रुपयांचा चुराडा केला आहे. विशेष म्हणजे, ज्या भागात हे कोट्यवधी रुपये खर्च झाल्याचे दाखवले जात आहे, त्याच भागात आजही विजेचा लपंडाव कायम असल्याने हा सर्व प्रकार म्हणजे जनतेच्या पैशांची दिवसाढवळ्या लूट असल्याची चर्चा सुरू झाली आहे.




कंत्राटदारांची 'रिंग' आणि अधिकाऱ्यांचे 'अर्थपूर्ण' मौन?

अहवालातील आकडेवारी पाहिल्यास ठराविक कंत्राटदारांवरच कामांची खिरापत वाटण्यात आली आहे. ६८ वर्क ऑर्डर्समध्ये ठराविक एजन्सींची नावे वारंवार येत आहेत.

तलवडा, शिरसदेवी, मादळमोही आणि गेवराई शहरात विशिष्ट कंत्राटदारांनीच आपले पाय घट्ट रोवले आहेत. नवीन कंत्राटदारांना डावलून जुन्याच 'चढत्या' दराच्या कंत्राटदारांना कामे का दिली जातात? यामागे महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे टक्केवारीचे गणित तर नाही ना? असा सवाल उपस्थित होत आहे.

कागदावर दुरुस्ती, जमिनीवर मात्र 'अंधारच'!

कढ आणि ङढ लाईनच्या दुरुस्तीवर लाखो रुपये खर्च झाल्याचे रिपोर्ट सांगतो. मग तांत्रिक बिघाड झाल्यास महावितरणचे कर्मचारी 'साहित्य नाही' किंवा 'कंत्राटदार उपलब्ध नाही' अशी उत्तरे का देतात? ट्रान्सफॉर्मर दुरुस्तीच्या नावाखाली काढलेली लाखो रुपयांची बिले प्रत्यक्षात कोणाच्या खिशात गेली, हा संशोधनाचा विषय बनला आहे. अनेक गावांत आजही जुन्याच तारा आणि मोडकळीस आलेले खांब जीवघेणे ठरत आहेत.


### त्वरित कामाचा मोठा 'झोल'; साहित्याची पळवापळवी!

गेवराई कार्यालयात एक नवीनच पॅटर्न रुजला आहे. एखादा श्रीमंत ग्राहक किंवा मोठा व्यावसायिक आल्यास, त्याला त्वरीत इलेक्ट्रिक सुविधा आणि तत्काळ जोडणी देण्याचे आमिष दाखवले जाते. वास्तविक, महावितरणचे नियम सर्वांसाठी सारखे असताना, 'त्या' लाडक्या कंत्राटदाराला हाताशी धरून नियमबाह्य पद्धतीने रातोरात पोल आणि ट्रान्सफॉर्मर उभे केले जातात. आम्ही तत्पर सेवा देतो असे भासवून या कामापोटी लाखांची माया गोळा केली जात आहे, ज्यामध्ये अधिकाऱ्यांची मोठी भागीदारी असल्याची चर्चा आहे.

### माहिती लपवण्याचा प्रयत्न? ब्लँक रकाने उघड करतायत गौडबंगाल!

अहवालात अनेक महत्त्वाच्या कामांच्या नोंदी 'कोऱ्या' (इश्ररपज्ञ) ठेवण्यात आल्या आहेत. ज्या कामांचा तपशीलच नाही, त्यांचे हिशोब कसे लावले गेले? ही म हावितरणची प्रशासकीय चूक नसून, आर्थिक गैरव्यवहार लपवण्याचा जाणीवपूर्वक केलेला प्रयत्न असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. ऑडिटमध्ये ही बाब समोर येऊनही अद्याप कोणावरही जबाबदारी निश्चित करण्यात आलेली नाही.

# जिल्ह्यातील ग्रामपंचायत निवडणुका लांबणीवर !




### २०२६ मध्ये मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायती

अकोले ५२, संगमनेर ९४, कोपरगाव २९, राहाता २५, श्रीरामपूर २७, राहुरी ४४, नेवासा ५९, पाथर्डी ७८, शेवगाव ४८, कर्जत ५६, जामखेड ४७, पारनेर ८८, श्रीगोंदा ५९ एकूण ७६५ असे आहेत.

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कोणत्या ना कोणत्या कारणाने रखडत लांबल्याचे दिसत आहेत. यामुळे नगर जिल्ह्यात मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतीच्या निवडणुकाही लांबणीवर पडणार असून आधीच्या ९९ आणि आता २०२६ मध्ये ७६७ ग्राम पंचायतींची मुदत संपणार आहे. जिल्हा परिषद निवडणूका झाल्याशिवाय मुदत संपलेल्या या ८६६ ग्रामपंचायतींच्या निवडणूका होणार नाहीत. मुदत संपलेल्या जिल्ह्यातील ग्रामपंचायतींच्या निवडणूका आता दिवाळीनंतर किंवा थेट पुढील वर्षी होण्याचा अंदाज प्रशासनाला आहे.

जिल्ह्यातील २०२४-२५ मधील मुदत संपलेल्या ९९ ग्रामपंचायतीच्या निवडणुका आधी लोकसभा व त्यानंतर विधानसभा निवडणुकीमुळे लांबणीवर पडल्या. सध्या येथे प्रशासकामार्फत कारभार सुरू आहे. आता त्यात ही पुढील महिन्यांत ७६७ ग्रामपंचायतींची पाच वर्षांची मुदत संपणार आहे. तेथे निर्धारित वेळेत नवे सदस्य निवडून येण्यासाठी डिसेंबर महिन्यातच ग्रामपंचायतींचा निवडणूक कार्यक्रम जाहीर होणे अपेक्षित होते. परंतू आधी नगरपालिकांची प्रक्रिया आणि त्यानंतर लांबलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणूका याम ुळे जिल्ह्यातील ८६६ ग्रामपंचायतींच्या निवडणूकांसाठी दिवाळीनंतर प्रक्रिया सुरू होणार आहे.दरम्यान मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींच्या निवडणूक प्रक्रियपूर्वी त्या त्या ग्रामपंचायतींचा प्रभाग रचना कार्यक्रम तयार करून तो प्रसिध्द करून त्यावर हरकती, सुनावणी घेवून तो अंतिम करून प्रसिध्द करावा लागतो.

यासाठी साधारणपणे एक ते दीड महिन्यांचा कालावधी लागतो. जिल्ह्यात अजून जिल्हा परिषदांच्या निवडणूका होणे बाकी आहेत. त्या निवडणूक उन्हाळ्यात झाल्यास त्यानंतर पावसाळ्यात कोणत्याच निवडणूका होत नाहीत. जिल्ह्यातील पावसाळा साधारण दिवाळीच्या दरम्यान संपतो. त्यानंतर ग्रामपंचायत निवडणूक तयारीसाठी महिना-दोन म हिन्यांचा कालावधी लागणार असल्याने जिल्ह्यातील ८६६ ग्रामपंचायतींच्या निवडणुकीसाठी पुढील वर्षी जानेवारीच उजाडण्याची शक्यता व्यक्त होत आहे.






दखल